पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
14 वर्ष वर्धापन दिन
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३३ ■ शुक्रवार, दि.१२ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# एजंट चालवितो अन्न व औषध प्रशासनाचा कारभार ?

### याची चौकशी व कारवाई
- या एजंटच्या कॉम्प्युटरचा आयपी ?ड्रेस आणि लॉगिन हिस्ट्री तपासावी.
- सरकारी कामात बेकायदेशीर हस्तक्षेप करणाऱ्या दलालावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.
- खाजगी एजंटच्या भरवशावर कारभाराची चौकशी करत अधिकाऱ्यांची बदली करावी

## अकोला एफडिएमध्ये दलालाचा उच्छाद ! फॉर्मासिस्ट नसतानाही दुकाने सुसाट




प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** अकोल्यातील अन्न व औषध प्रशासन विभागात नेमके अधिकारी काम करतात की एखादा खाजगी दलाल ? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अकोला शहर आणि जिल्ह्यात फॉर्मासिस्ट नसतानाही राजरोसपणे मेडिकल दुकाने थाटून रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. पण, या गंभीर प्रकारावर कारवाई का होत नाही ? कारण, या संपूर्ण काळ्या बाजाराच्या मागे 'केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन'चा एक बडा पदाधिकारी सक्रिय असून, तोच या सरकारी कार्यालयाचा मुख्य 'एजंट' (दलाल) म्हणून सर्व सूत्रे हलवत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.एवढेच नव्हे, तर 'सिटी न्यूज सुपरफास्ट' आणि 'आर आर सी न्यूज'ने जेव्हा या खाबूगिरीबाबत औषध विभाग प्रमुखांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी आपण अमरावतीत असल्याचे सांगून नेहमीप्रमाणे पळवाट काढली. अकोल्यात आल्यावर संपर्क करू, असे गुळमुळीत आश्वासन त्यांनी दिले आहे, ज्यामुळे अधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप मिळू शकलेली नाही.

### सरकारी पासवर्ड दलालाच्या हाती !

या औषध विभागात भ्रष्टाचाराचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचा ढळढळीत पुरावाच समोर आला आहे. नवीन मेडिकल लायसन्स काढणे असो वा त्याचे नूतनीकरण करणे, 'त्या' महाभागाच्या संमतीशिवाय इथे पाऊलही हलत नाही.अन्न व औषध प्रशासनाच्या औषध विभागाचे अत्यंत गोपनीय 'लॉगिन आयडी आणि पासवर्ड' चक्क या खाजगी एजंटच्या ताब्यात आहेत. हा एजंट स्वतःच्याच कॉम्प्युटरवरून, स्वतःच्याच आयपी अ‍ॅड्रेसचा वापर करून नवीन लायसन्स बनवतो आणि नूतनीकरण करतो. जिल्ह्यातील सर्व मेडिकल शॉपचे ईमेल, अ‍ॅड्रेस आणि लॉगिन आयडी या दलालाने आपल्या खिशात ठेवले आहेत.

### तुकाराम मुंडे या 'दलालाचा' गेम ओव्हर करणार का ?



लायसन्स मॅनेज करण्यापलीकडे जाऊन, या एजंटने आता फॉर्मासिस्ट नसलेली बेकायदेशीर दुकाने सुरू ठेवण्यासाठी मेडिकल चालकांकडून हजारो रुपयांची बेधडक वसुली सुरू केली आहे. मेडिकल धारकांना धमकावून आणि प्रशासनाची भीती दाखवून हजारो रुपये उकळणारा हा 'महाभाग' नेमका कोण ? असा संतप्त सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. अकोला कार्यालयात फिरकण्यासही टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याला महिन्याकाठी 'लाखो रुपयांचे पाकीट' पोहोचवण्याची महत्त्वाची जबाबदारी हा केमिस्ट असोसिएशनचा पदाधिकारीच चोख पार पाडत असल्याची धक्कादायक चर्चा आहे. अधिकारी आणि या दलालाचे हे साटेलोटे थेट जनतेच्या आरोग्याशी खेळणारे आहे. अन्न व औषध प्रशासनाचे नवे धडक आयुक्त तुकाराम मुंडे आता या भ्रष्ट साखळीचा पर्दाफाश करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## १९५० नंतरचा सर्वात भीषण 'एल निनो' सक्रिय !
# भारतावर दुष्काळाचे सावट ?

प्रतिनिधी १२ जून

**मुंबई :** प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडीक्शन सेंटरने केली आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र 'एल निनो' राहण्याचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असा अंदाज देखील आहे. २०२७ च्या पूर्वार्धातही 'एल निनो' सक्रिय असेल असा कयास बांधला जात आहे. प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन (सीपीसी) सेंटरने गुरुवारी केली. डिसेंबरपर्यंत एल निनोची तीव्रता अतितीव्र स्वरूपाची होणार असून, यंदाचा एल निनो १९५० पासूनच्या नोंदींमधील सर्वाधिक तीव्र ठरण्याची शक्यता सीपीसीने वर्तवली आहे. सीपीसीने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, गेल्या महिनाभरात एल निनोची स्थिती विकसित झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यंदाचा एल निनो फेब्रुवारी २०२७ मध्येही सक्रिय राहण्याची शक्यता ९० टक्क्यांहून जास्त असल्याचे सीपीसीच्या अंदाजात म्हटले आहे.

आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र असा एल निनो राहण्याचा अंदाज वर्तवला जातोय. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असाही अंदाज असेल, २०२७ च्या पूर्वार्धातही एलनेनो सक्रिय असेल असा कयास बांधला जातोय आणि अर्थातच या एल निनोचा मोठा परिणाम हा मान्सूनवर होतोय आणि त्यामुळे महाराष्ट्राला देखील त्याचा फटका बसू शकतो, सरासरी पेक्षा यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे, एल निनोचा प्रभाव वाढतोय, त्याची वाटचाल सुरू झालेली आहे कसे परिणाम होऊ शकतात.

## अशोक खरात प्रकरणात उज्ज्वल निकमांची एन्ट्री !
# विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

प्रतिनिधी १२ जून



**पुणे :** अंधश्रद्धा आणि तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणाच्या कायदेशीर लढाईत आता देशातील नामांकित कायदेतज्ज्ञ आणि ज्येष्ठ वकील अ?ॅड. उज्ज्वल निकम यांची एन्ट्री झाली आहे.

या हाय-प्रोफाइल खटल्यात सरकारची बाजू मांडण्यासाठी राज्य शासनाने उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. ॲड. निकम यांच्या एन्ट्रीमुळे या प्रकरणाशी संबंधित असलेल्या बड्या राजकीय नेत्यांचे आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. स्वतःला सिद्धपुरुष आणि अंकशास्त्रज्ञ म्हणवून घेणारा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण राज्यभरात चर्चेत आले आहे. दैवी शक्तीची भीती दाखवून, गुंगीचे औषध देऊन आणि प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या पेढा किंवा पाण्यातून अंमली पदार्थ देऊन तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा. याप्रकरणी पीडित महिलांच्या तक्रारीनंतर नाशिक पोलिसांनी खरातला अटक केली असून, या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून याचा तपास विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला आहे. 'एसआयटी'ने या प्रकरणाचा सखोल तपास करताना आरोपी अशोक खरात याच्या कार्यालय आणि फार्म हाऊसची कसून झडती घेतली. या कारवाईदरम्यान पोलिसांच्या हाती अत्यंत धक्कादायक पुरावे लागले आहेत. महिलांचे लैंगिक शोषण करतानाचे तब्बल १०० हून अधिक अश्लील व्हिडिओ पोलिसांना मिळून आले आहेत.

## एका ग्राहकाला २०० लिटर डिझेल

वृत्तसंस्था १२ जून

**नवी दिल्ली:** सामान्य ग्राहक एका दिवसात जास्तीत जास्त २०० लीटर डिझेलच खरेदी करू शकतील. हे डिझेल पुन्हा विकण्यावर पूर्णपणे बंदी असेल. याशिवाय, आता कारखाने आणि व्यावसायिक वापरकर्त्यांना किरकोळ विक्री केंद्रातून इंधन मिळणार नाही. केंद्र सरकारने ११ जून २०२६ रोजी याबाबत आदेश जारी केला आहे. ही बंदी सुरुवातीला ९० दिवसांसाठी लागू करण्यात आली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या निर्णयामुळे सामान्य ग्राहकांसाठी इंधनाची कमतरता भासणार नाही. आता कोणतीही फॅक्टरी, व्यावसायिक संस्था किंवा मोठ्या संस्था सामान्य गाड्यांसाठी असलेल्या पेट्रोल पंपावरून डिझेल-पेट्रोल खरेदी करू शकणार नाहीत.

## तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता माऊलींच्या शेगावात!

प्रतिनिधी १२ जून

**बुलढाणा :** अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशाने राज्यभर भेसळयुक्त खाद्यपदार्थांची तपासणी करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. साईंच्या शिर्डीनंतर मुंढेंनी आता आपला मोर्चा गजानन महाराजांच्या नगरीत शेगावमध्ये वळवला आहे. शेगावमधील प्रसिद्ध कचोरी सेंटरवर जिल्हा अन्न आणि औषध प्रशासनाने छापा टाकल्याची माहिती समोर आहे.

## 'मोदी सर्वोत्कृष्ट पंतप्रधान'; सीएम फडणवीसांनी केले कौतुक

प्रतिनिधी १२ जून



**मुंबई** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव केला. देशाची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, महिला सक्षमीकरण, गरिबी निर्मूलन आणि जागतिक स्तरावरील भारताची वाढती प्रतिष्ठा यांचा उल्लेख करत फडणवीस यांनी मोदी यांना 'केवळ सर्वाधिक काळ निवडून आलेले पंतप्रधान नव्हे, तर देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान' असे संबोधले. याचवेळी त्यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरही टीका करत काँग्रेसला 'बुडते जहाज' म्हटले. मोदी यांनी जगभरात भारताची प्रतिष्ठा उंचावली असून आज एनडीए देशातील २२ राज्यांमध्ये सत्तेत आहे. देशाच्या सुमारे ८० टक्के भूभागावर एनडीएची सरकारे आहेत, असे त्यांनी सांगितले. भारत आज जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे.भारताची अर्थव्यवस्था ३४५ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून देश ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे. डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात भारताने चीनलाही मागे टाकले असल्याचे सांगत त्यांनी नमूद केले की, यूपीआयद्वारे ३१४ लाख कोटी रुपयांचे व्यवहार होत आहेत आणि भारताने विकसित केलेली यूपीआय प्रणाली आता ३० देश वापरत आहेत.

# आयुक्त सुट्टीवर, महापालिका वाऱ्यावर !
## आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांचा घोळ; तपास होणार का



प्रतिनिधी १२ जून

**अकोला:** अकोला महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. लहाने सध्या सुट्टीवर गेले आहेत आणि त्यांच्या अनुपस्थितीत संपूर्ण महापालिका जणू वाऱ्यावर सोडल्यागत परिस्थिती निर्माण झाली आहे. आयुक्त बदलीसाठी प्रयत्नरत असल्याची चर्चा महापालिकेत आहे. आयुक्त जागेवर नसल्याचा गैरफायदा घेत मनपाचे काही कर्मचारी वेळेवर येत नाहीत आणि वेळ संपण्यापूर्वीच पळ काढत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, आयुक्त पदाचा अतिरिक्त प्रभार हाती घेताच जिल्हाधिकारी मिना यांनी मनपातील या अनागोंदी कारभाराची गंभीर दखल घेतली काय अशी विचारणा होत आहे. आयुक्त डॉ. लहाने सुट्टीवर गेल्यानंतर मनपाचा प्रभार जिल्हाधिकारी मिना यांच्याकडे आला आहे. महापालिकेतील या सर्व गैरप्रकारांची आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानीची कुणकुण जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली आहे. चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आता मनपातील 'कामचोर' अधिकारी आणि आऊटसोर्सिंगचे ठेकेदार यांचे धाबे दणाणले आहेत.

### कोरोनाचे नाव करून 'थंब मशिन्स' गायब !

महापालिकेत कर्मचाऱ्यांच्या लेट-लतीफ कारभाराला चाप लावण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी (थंब मशिन्स) सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र, कोरोना महामारीचे कारण पुढे करून या थंब मशिन्स गायब करण्यात आल्या त्या आजतागायत बंदच आहेत. मशिन्स गायब झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे चांगलेच फावले असून, 'आओ जावो घर तुम्हारा' अशी स्थिती निर्माण झाली आहे. आयुक्त नसल्यामुळे तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही.

### २४ दिवसांची हजेरी आणि १००टक्के 'फिटनेस'!

अकोला महानगरपालिका
जनहित सर्वतोपरी

मनपातील आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांच्या हजेरीबाबत अत्यंत धक्कादायक बाबी समोर येत आहेत. सुमारे ४०० आऊटसोर्सिंग कर्मचाऱ्यांचे मानधन आणि त्यांची हजेरी नक्की कोण तपासते ? हा मोठा प्रश्न आहे. विशेष म्हणजे, या कर्मचाऱ्यांच्या हजेरी पटावर सर्वांचीच महिनाभरात २४ दिवसांची पूर्ण हजेरी दाखवली जाते. यात आश्चर्यकारक बाब अशी की, या ४०० पैकी कोणीच कधी आजारी पडत नाही, कोणीच कधी सुट्टी घेत नाही! सर्वांची शंभर टक्के उपस्थिती दाखवून मनपाच्या तिजोरीवर दरोडा टाकला जात असल्याचा संशय बळावला आहे. कोणाला कधीच मंगल कार्यासाठी जावे लागत नाही, कोणीला कधीच परिवारासोबत बाहेरगावी जावे लागत नाही. ते सगळे अकोल्यात महापालिकेच्या शतप्रतिशत सेवेत कायम असतात.

### महान जलशुद्धीकरण केंद्रावर घोळच घोळ

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महान येथील जलशुद्धीकरण केंद्रावर कागदोपत्री किती कर्मचारी नियुक्त आहेत आणि प्रत्यक्षात किती जण तिथे उपस्थित राहून सेवा देतात, हा मोठा संशयाचा विषय बनला आहे. हजेरी पटावर सही करायला अनेक जण गायब असतात, तर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी शुकशुकाट असतो. या केंद्रावरील हजेरी घोटाळयाची चौकशी केल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### भाजप पदाधिकाऱ्यांच्या नातेवाइकांची 'कृपा'

या संपूर्ण गैरकारभारात राजकीय वरदहस्त असल्याची चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. अनेक भाजप पदाधिकाऱ्यांच्या नातेवाइकांना आऊटसोर्सिंग यंत्रणेत सामावून घेण्यात आले आहे. मात्र, या व्ही.आय.पी. कर्मचाऱ्यांची नेमकी ड्युटी कुठे आहे, ते कुठे काम करतात, याच पत्ता नाही. इतकेच नव्हे तर, काही लाडक्या कर्मचाऱ्यांची एकाच वेळी दोन वेगवेगळया विभागांमध्ये ड्युटी दाखवली जात आहे का ? असाही गंभीर प्रश्न उपस्थित होत असून यामागचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.



सुरेश भट (१५ एप्रिल १९३२ - १४ मार्च २००३) हे मराठी साहित्यातील एक उत्तुंग आणि वंदनीय व्यक्तिमत्त्व. मराठीच्या काव्यसृष्टीवर त्यांनी पाडलेल्या दूरगामी आणि गडद प्रभावासोबतच मराठी साहित्यात उर्दू गजलचा अविष्कार केल्यामुळे त्यांना बहुदा 'मराठीचे ग़ालिब' म्हणून गौरवले जाते. उर्दू भाषेसोबत त्यांचे नाते अत्यंत घट्ट आणि आदिबंधासारखे होते; ज्याची प्रचिती त्यांनी गझल या काव्यप्रकारावर मिळवलेल्या तांत्रिक प्रभुत्वातून आणि त्यांच्या रचनांमधील भाषिक समन्वयातून येते.

**मराठी गझलचे ग़ालिब :** सुरेश भट यांनी उर्दू भाषेचा अभ्यास केला अणि लगेच या भाषा अणि उर्दू शायरीच्या प्रेमात पडले. स्वतः कविता लिहितांना त्यांनी मराठी कवितेला उर्दू गझलेच्या मिठीत दिला म्हणून त्यांना उर्दू साहित्यात जे स्थान मिर्झा ग़ालिब यांचे आहे, तेच मानाचे आणि दंतकथा बनलेले स्थान मराठी काव्यात सुरेश भट यांना मिळाले. भटांच्या लेखणीत ग़ालिबसारखीच बौद्धिक खोली, उत्कट रोमँटिकता (भावविवशता) आणि तात्त्विक चिंतन ओतप्रोत भरलेले दिसते. यामुळेच, उर्दू समीक्षक आणि वाचकांना मराठी साहित्याची गोडी लावणारा एक भक्कम सेतू त्यांच्या कवितेने निर्माण केला.

# मराठी गझलचे ग़ालिब : सुरेश भट



सुरेश भट यांचा सांगीतिक प्रवास अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण होता: त्यांनी प्रल्हादबुवांकडे संगीताचे धडे गिरवले आणि पुढे पंडित भातखंडे यांच्या ग्रंथांचा अभ्यास करून हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील सैद्धांतिक खोली आत्मसात केली. हार्मोनियमव्यतिरिक्त, आजारपणाच्या काळात ते बासरी वाजवत. त्यांनी उस्ताद लडडू मियाँ यांच्याकडे तबल्याचे धडे घेतले आणि ढोलकविषयी त्यांना विशेष ओढ होती. पंडित ओंकारनाथ ठाकूर यांच्यासारख्या दिग्गजांसोबत व्हायोलिन वाजवणारे त्यांचे काका अनेकदा म्हणायचे की, सुरेश यांच्यात राष्ट्रीय दर्जाचा गायक बनण्याची क्षमता आहे.

त्यांच्या या गायकीच्या कौशल्यावर १९८४ मध्ये खुद्द संगीतसम्राट हृदयनाथ मंगेशकर यांनी शिक्कामोर्तब केले. अमरावतीतील एका कार्यक्रमादरम्यान सुरेशरावांची सूर आणि लाटांवरील पकड पाहून हृदयनाथ इतके मंत्रमुग्ध झाले की, त्यांनी उत्स्फूर्तपणे त्यांना हार्मोनियमवर साथ देण्यास सुरुवात केली. नंतर त्यांनी कबूल केले की, 'हा कवी एवढा कसलेला गायक असेल, याची मला पुसटशीही कल्पना नव्हती. 'सुरेल आवाजासाठी शरीरयष्टीही तितकीच सुदृढ हवी,' यावर सुरेशरावांचा विश्वास होता. ते व्यायामाचे प्रचंड शौकीन होते. डबल बारवर रोज १०० ते १५० डीप्स (बैठका) मारणे हा त्यांचा नित्यक्रम होता. या कठोर शारीरिक कसरतीमुळे त्यांच्या फुफ्फुसांची क्षमता कमालीची वाढली; आणि हाच 'श्वासावरील ताबा' (ब्रेथ कंट्रोल) पुढे त्यांच्या दमदार आणि भावनाप्रधान काव्यवाचनाचे मुख्य अस्त्र बनला.

सुरेशरावांकडे एका कसलेल्या कारागिराचे हात आणि शिकाऱ्याची नजर होती. १९५० च्या दशकात ते बांबूच्या पट्ट्या आणि कागदी नळ्यांपासून अतिशय सुंदर पतंग, आकाशकंदील आणि कॅलिडोस्कोप (शोभादर्शक नळी) बनवण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांचे छंद अनेकदा साहसी वळण घेत. 'द थ्री मस्केटियर्स' आणि 'निशान' यांसारख्या चित्रपटांतून प्रेरणा घेऊन त्यांनी वेतापासून स्वतःच्या तलवारी (फेन्सिंग फॉइल्स) बनवल्या आणि आपले मित्र बाबा मोटे (जे पुढे आयआयएम अहमदाबादमध्ये प्राध्यापक झाले) यांच्यासोबत तलवारबाजीचा सराव केला. जर्मनी बनावटीच्या 'डायना' एअर गनने अचूक नेमबाजी करण्यात ते इतके पटाईत होते की, चालते-फिरते लक्ष्यही ते सहज भेदत असत. गुलाबराव महाराजांच्या आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यास असो वा जागतिक शस्त्रास्त्रांचे संशोधन, सुरेश भट कोणताही विषय अर्धवट सोडत नसत. कोणत्याही विषयाच्या अगदी मुळाशी जाण्याची एक अनावर जिद्द त्यांच्यात होती.

या अष्टपैलू पार्श्वभूमीमुळेच त्यांच्या कवितेला एक आगळीवेगळी धार लाभली. जेव्हा हृदयनाथ मंगेशकरांनी भटांच्या कवितांना चाली लावल्या, तेव्हा त्यांना अनेकदा ते आव्हानात्मक वाटायचे; कारण सुरेशरावांच्या मूळ रचना आधीच सांगीतिकदृष्ट्या परिपूर्ण असायच्या. आज आपण ज्या महान कवीचा गौरव करतो, तो विविध आवडीनिवडी, शिस्तबद्ध सराव आणि ज्ञानाची अतृप्त भूक यांच्या भट्टीतून तावूनसुलाखून निघालेला एक सुवर्णकण होता.

भट यांचे केवळ उर्दू भाषेवरच नव्हे, तर उर्दू शायरी आणि प्रामुख्याने गझल विधावर असीम प्रेम होते. उर्दू गझलेच्या याच सौंदर्यशास्त्राने प्रेरित होऊन त्यांनी हा जिवंत काव्यप्रकार मराठीत आणला. त्यांनी केवळ गझला लिहिल्याच नाहीत, तर महाराष्ट्रात या प्रकाराला बहरण्यासाठी एक भक्कम पायाभूत चौकट आणि एक समृद्ध व्यासपीठ निर्माण करून दिले. त्यांचे लेखन म्हणजे तीक्ष्ण सामाजिक विद्रोहाची धार आणि मानवी दुःख व प्रेमाविषयीचे अत्यंत वैयक्तिक आत्मपरीक्षण यांचा एक अद्भूत संगम आहे. वृत्त, छंद आणि लयीवरील त्यांच्या अफाट प्रभूत्वामुळे त्यांच्या रचना संगीतासाठी उपजतच अनुकूल होत्या. हाच गुण त्यांची गझल आजही साहित्यात आणि संगीताच्या विश्वात अजरामर आहे.

**मराठी गझलचे आद्य प्रणेते :** मराठी साहित्यात गझल या काव्यप्रकाराला एक शास्त्रशुद्ध, औपचारिक आणि लोकप्रिय रूप देण्याचे श्रेय सर्वस्वी सुरेश भट यांना जाते. रदीफ़ आणि काफ़िया यांसारख्या उर्दूच्या कठोर तांत्रिक चौकटींचे तंतोतंत पालन करत, त्यांनी हा फॉर्म मराठी मातीत असा काही रुजवला की मराठी गझलेला एक स्वतंत्र पण पारंपरिक आत्मा लाभला. माध्यम जरी मराठी असले, तरी त्यांच्या शब्दकळेवर आणि शैलीवर उर्दू-फारसीचा गडद प्रभाव होता. त्यांनी वापरलेली काही ठराविक रूपके आणि वाक्प्रकार यांच्यामुळे त्यांच्या मराठी रचना उर्दू शायरीच्या अगदी जवळ जाणाऱ्या वाटतात. आज सुरेश भट यांच्या मराठी गजलेचा वारसा जपणारे हजारो कवि आपल्याला दिसतात ज्यांच्यात डॉ. गणेश गायकवाड (बुलढाणा), डॉ. रवी चापके (पुसद) आबिद शेख (सवना) इत्यादींचा नाव घेता येईल.

**बालपण आणि पूर्वआयुष्य :** पुढे जाऊन 'गझल सम्राट' म्हणून जनमानसावर अधिराज्य गाजवण्यापूर्वी, सुरेश भट हे अथांग कुतूहल आणि अष्टपैलू प्रतिभा लाभलेले एक तरुण होते. इतिहास जरी त्यांना त्यांच्या लेखणीच्या अचूकतेसाठी ओळखत असला, तरी त्यांच्या तारुण्यात त्यांना जवळून अनुभवणारे त्यांचे बंधू दिलीप श्रीधर भट यांच्या आठवणींनुसार, सुरेशराव हे एक 'हरहुन्नरी' (हर-फ़न-मौला) व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे कौशल्य अभिजात संगीतापासून थेट तलवारबाजीपर्यंत विस्तारलेले होते.

सुरेशरावांच्या संगीताचा पाया त्यांच्या मातोश्री शांताबाई भट यांनी रचला. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना दिलीप भट इतिहासाची पाने उलटून सांगतात की, सुरेशरावांमधील उपजत लय आणि सुरांचे ज्ञान ओळखून त्यांच्या आईने त्यांना कोलकात्याहून 'विश्वास कंपनी'चा हार्मोनियम आणून दिला आणि संगीताचे प्राथमिक धडे स्वतः दिले. त्यांचे वडील डॉ. एस. आर. भट यांनी दर आठवड्याला एचएमव्ही ची एक नवी ग्रॅमफोन रेकॉर्ड घरात आणून या छंदाला अधिकच खतपाणी घातले. त्यामुळे उत्तम दर्जाचे संगीत हा या कुटुंबाचा जणू श्वास बनला होता.

................

**भक्तीकाव्य आणि अनुवाद :** भट यांच्या सृजनशीलतेची व्याप्ती 'नाअत' (प्रेषितांची स्तुती करणारे भक्तीकाव्य) लिहिण्यापर्यंत पसरली होती. त्यांची अत्यंत लोकप्रिय आणि मनाला भिडणारी मराठी 'नाअत' म्हणजे. 'उजाड वैराण वाळवंटी खराळणारा झरा मुहम्मद' (मोहम्मद पैगंबर हे उजाड आणि निर्मनुष्य वाळवंटातील पाण्याचा जिवंत झरा होते). या प्रसिद्ध मराठी नाअतचा उर्दूमध्ये अनुवाद झाला आणि विख्यात अभ्यासक डॉ. सय्यद याह्या नशीत यांच्या विश्लेषणात्मक निबंधाचा तो विषय बनली. यावरून भटांच्या सांस्कृतिक आणि भाषिक सीमा ओलांडणाऱ्या प्रतिभेची साक्ष पटते. मराठी आणि उर्दू साहित्यातील दरी सांधणारा सुरेश भट यांच्यासारखा दुसरा दुवा दुर्मिळच. मराठी भाषेला उर्दू गझलेची तांत्रिक अचूकता आणि भावनिक मिजास बहाल करून त्यांनी भाषिक सीमांच्या पलीकडे जाणारा एक अजरामर वारसा निर्माण केला. भटांचे काव्यवैभव त्यांच्या 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार' आणि 'झंझावात' यांसारख्या गाजलेल्या संग्रहांमध्ये जिवंत आहे, जे आजही मराठी काव्यसृष्टीचे मानदंड मानले जातात. त्यांच्या कवितांमधील दाहकता आणि बंडखोरी जितकी तीव्र आहे, तितकीच प्रेमातील आर्तता आणि व्याकुळताही हळवी आहे. त्यांच्या काही अत्यंत लोकप्रिय आणि काळजाचा ठाव घेणाऱ्या गझला खालीलप्रमाणे आहेत.

**'विझलो आज जरी मी':** संकटांसमोर न झुकण्याची आणि फिनिक्ससारखे झेप घेण्याची जिद्द शिकवणारी अमर गझल. 'रंग माझा वेगळा': त्यांच्या स्वतःच्या कलंदर आणि विद्रोही व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटवणारी त्यांची स्वाक्षरी असलेली गझल.

**'हे कसे प्रेम?':** प्रेमाच्या गुंतागुंतीच्या छटांचे हळुवार प्रकटीकरण. त्यांचे शब्द केवळ पुस्तकाच्या पानांवर मर्यादित राहिले नाहीत, तर भारताच्या महान गायकांच्या आवाजातून ते महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचले. भारतरत्न लता मंगेशकर, आशा भोसले आणि सुरेश वाडकर यांसारख्या दिग्गज गायकांनी, हृदयनाथ मंगेशकरांच्या अजोड संगीत संमिश्रणाखाली या शब्दांना स्वरसाज चढवला.



प्रा. खाऩ हसनैन आक़िब

कवी, साहित्यिक पुसद

# समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अपरिहार्य

## डॉ. अविनाश इंगळे : ज्येष्ठ नागरिक विचारमंचातर्फे डॉक्टरांचा सन्मान सोहळा उत्साहात

**अकोला :** समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मूलतत्त्वे आहेत. जात, धर्म आणि विषमता यांपलीकडे जाऊन सर्वसमावेशक व न्यायाधिष्ठित समाज घडविण्यासाठी त्यांच्या विचारांचे आचरण आजच्या काळात अधिक आवश्यक ठरते. समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही अपरिहार्य आहेत. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्याय या त्रिसूत्रीवर समाजाची प्रगती अवलंबून आहे, असे प्रतिपादन रायपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. अविनाश इंगळे यांनी केले.

मानवतेच्या आरोग्यसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या चर्मकार समाजातील मान्यवर डॉक्टरांचा सन्मान सोहळा ज्येष्ठ नागरिक विचारमंच, अकोला यांच्या वतीने प्रमिलाताई ओक हॉल येथे रविवारी उत्साहात पार पडला. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. इंगळे बोलत होते.

सोहळ्याचे उदघाटन सेवा निवृत्त जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ. शंकरराव उंबरकर यांच्या हस्ते झाले. प्रारंभी संत रविदास महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. समाजहित, सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठा यांचा आदर्श निर्माण करणाऱ्या डॉक्टरांच्या कार्याचा शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



यावेळी विचारमंचावर ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ, 'रोसा' या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव दांडगे, आयुर्वेद कन्सल्टंट व योगतज्ज्ञ डॉ. कल्याणी पदमने, रामागुंडम येथील एचपीसीएल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री आयरे-गव्हाळे, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त उप कुलसचिव प्रल्हाद शेकोकार, स्वागताध्यक्ष प्रा. गजानन पदमने यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ नागरिक विचारमंचच्या विविध नाविन्यपूर्ण व समाजास प्रेरणा देणाऱ्या उपक्रमांची माहिती प्रास्ताविकाद्वारे प्रल्हाद शेकोकार यांनी दिली.

याप्रसंगी कार्यक्रमास विशेष योगदान देणारे प्रा. राहुल शेगोकार, दिनकरराव वानखडे, डॉ. अनिकेत भटकर, डॉ. कांचन किशोर शेगोकार, भास्करराव वजीरे, ज्ञानेश पदमने, पांडुरंग चोपडे, डॉ.अप्पासाहेब डामरे, किशोर शेगोकार, वसंत महाराज शेगोकार, गजानन डामरे, ?ड. रवींद्र काकडे, एकनाथ शेगोकार, श्रीकृष्ण डांगे, मधुकर वानेडकर, प्रवीण चोपडे यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक विचारमंचाच्या पदाधिकारी, सदस्यांचे सलाह प्रा. लि. अकोला यांच्या वतीने मान्यवरांचे हस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. समाजातील मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला.

आरोग्यसेवा ही केवळ व्यवसाय नसून मानवसेवेचे सर्वोच्च माध्यम असल्याचे मान्यवरांनी सांगितले. समाजातील नव्या पिढीने या यशस्वी डॉक्टरांकडून प्रेरणा घेऊन शिक्षण, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा आदर्श अंगीकारावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सत्कारमूर्ती डॉक्टरांनीही आपल्या यशामागील संघर्ष, कुटुंबीयांचे सहकार्य आणि समाजाच्या पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सन्मानामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुसूदन गव्हाळे व श्यामली जांभळे यांनी केले. आभार रामभाऊ ताजने यांनी माानले.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक विचार मंचाचे सर्वश्री राम शेगोकार, पांडुरंग वाडेकर, राम गव्हाळे, जगदेवराव टाले, गजानन पदमणे, गणपत शेगोकार, लक्ष्मणराव पदमने, रामभाऊ ताजने, मधुसूदन गव्हाळे, प्रभाकर रेवासकर, प्रल्हाद शेकोकार, श्रीकृष्ण शेगोकार, सारंगधर भटकर, निवृत्ती चिम, काशिनाथ भटकर, रामकृष्ण शेगोकार, गणपत शेगोकार, गजानन काकडे, प्रा. गजानन पदमने आदी पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**नव्या पिढीला प्रेरणेचे आवाहन**

आरोग्यसेवा ही केवळ व्यवसाय नसून मानवसेवेचे सर्वोच्च माध्यम असल्याचे मान्यवरांनी अधोरेखित केले. समाजातील नव्या पिढीने या यशस्वी डॉक्टरांकडून प्रेरणा घेऊन शिक्षण, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा आदर्श अंगीकारावा, असे आवाहन करण्यात आले. सत्कारमूर्ती डॉक्टरांनी आपल्या यशामागील संघर्ष, कुटुंबीयांचे सहकार्य आणि समाजाच्या पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सन्मानामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## दिन विशेष

# बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे!



आज जागतिक बालकामगार विरोधी दिन

जागतिक बालकामगार विरोधी दिन हा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने मान्यता दिलेला एक दिवस आहे, जो बालकामगार रोखण्यासाठी जागरूकता आणि सक्रियता वाढवण्याच्या उद्देशाने २००२ मध्ये पहिल्यांदा सुरू करण्यात आला. दरवर्षी १२ जून रोजी साजरा होणारा जागतिक बालकामगार विरोधी दिवस हा बालकामगार विरोधी जागतिक चळवळीला चालना देण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो.

बालमजुरीच्या समस्येकडे सतत लक्ष वेधण्यासाठी आणि बालमजुरीचे निर्मूलन करण्याच्या आपल्या धोरणांमध्ये सुधारणा व पुनरावलोकन करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २००२ साली जागतिक बालमजुरी विरोधी दिनाची स्थापना केली . २००२ पासून १९ वर्षे झाली असून, जागतिक बालमजुरी विरोधी दिन दरवर्षी १२ जून रोजी साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने बालमजुरीच्या गंभीर समस्येची दखल घेत, २०२१ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय बालमजुरी निर्मूलन वर्ष' म्हणून घोषित करणारा ठराव एकमताने स्वीकारला आहे आणि त्याच्या अंमलबजावणीत पुढाकार घेण्यास आयएलओला सांगितले आहे. हा दिवस बालमजुरीच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आणि बालमजुरांना मदत करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याकरिता सरकार, स्थानिक प्राधिकरणे, नागरी समाज आणि आंतरराष्ट्रीय, कामगार व मालक संघटनांना एकत्र आणतो. आयएलओच्या आकडेवारीनुसार, जगभरातील कोट्यवधी मुली आणि मुले अशा कामात गुंतलेली आहेत ज्यामुळे त्यांना पुरेसे शिक्षण, आरोग्य, विश्रांती आणि मूलभूत स्वातंत्र्यांपासून वंचित ठेवले जाते, अशा प्रकारे त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन होते. या मुलांपैकी निम्म्याहून अधिक मुले बालमजुरीच्या सर्वात वाईट प्रकारांना सामोरे जातात. बालमजुरीच्या या सर्वात वाईट प्रकारांमध्ये धोकादायक वातावरणातील काम, गुलामगिरी किंवा इतर प्रकारची सक्तीची मजुरी, अमली पदार्थांची तस्करी आणि वेश्याव्यवसाय यांसारख्या अवैध कारवाया, तसेच सशस्त्र संघर्षात सहभाग यांचा समावेश आहे. बालमजुरी विरोधी जागतिक दिनाचे महत्त्व म्हणजे बालमजुरीच्या समस्येकडे लक्ष वेधणे आणि ती समूळ नष्ट करण्याचे मार्ग शोधणे. जगभरात बालमजुरीसाठी सक्ती केलेल्या मुलांना भेडसावणाऱ्या हानिकारक मानसिक आणि शारीरिक समस्यांबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी या दिवसाचा उपयोग केला जातो.

**भारतात बाल कामगार निषेध दिन :** भारतात बाल कामगारांची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. भारतात बाल कामगारांची सुद्धा तस्करी केली जाते. या संदर्भात केंद्र आणि राज्य सरकार कौतुकास्पद पावले उचलत आहेत. यासाठी १९८६ मध्ये पहिला बाल कामगार बंदी आणि नियमन कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार १४ वर्षाखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर ठरविले गेले. याद्वारे भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद २३ मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. तर कलम ४५ अंतर्गत देशातील सर्व राज्यांना १४ वर्षाखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# अकोल्यातील बाजारपेठेत विद्यार्थ्यांची आणि पालकांची गर्दी

## नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांमध्ये उत्साह



**अकोला :** लवकरच नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार असून त्याची लगबग आता अकोला शहरातही पाहायला मिळत आहे. शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना अकोल्यातील प्रमुख बाजारपेठा विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत.

दप्तर, वह्या, पुस्तके, युनिफॉर्म, शूज, पाण्याच्या बाटल्या तसेच इतर शालेय साहित्य खरेदीसाठी पालक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत दाखल होत आहेत.

यामुळे व्यापाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.अकोला शहरातील मुख्य बाजारपेठ, गांधी रोड, टॉवर परिसर, सिटी कोतवाली परिसर तसेच विविध शालेय साहित्य विक्री केंद्रांवर सध्या ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या तयारीसाठी पालक आपल्या पाल्यांसह दप्तर, वह्या, पुस्तके, युनिफॉर्म, शालेय बूट, रेनकोट, पाण्याच्या बाटल्या आणि इतर आवश्यक साहित्य खरेदी करताना दिसत आहेत.

बाजारात विविध प्रकारचे आकर्षक दप्तर, आधुनिक डिझाईनचे युनिफॉर्म तसेच विद्यार्थ्यांच्या आवडीच्या वस्तूंना मोठी मागणी आहे. त्यामुळे अनेक दुकानांमध्ये दिवसभर ग्राहकांची वर्दळ सुरू असल्याचे चित्र आहे.

# बिनशर्त कर्जमाफीची मागणी, राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार महानगरतर्फे निवेदन सादर

**अकोला :** राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार महानगरच्या वतीने महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज अकोला येथील निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या विविध समस्या व कर्जमाफीसंदर्भातील मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. शेतकऱ्यांच्या भावना, अडचणी आणि मागण्या महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारपर्यंत तात्काळ पोहोचविण्यात याव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांना न्याय मिळू शकेल, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेतील अनेक जाचक व गुंतागुंतीच्या अटींमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा तसेच योजनेतील विविध अटी रद्द करण्यात याव्यात.



निवेदनात विशेषतः सन २०१९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात यावी, एकरकमी कर्ज परतफेड (ओटीएस) योजनेतील अटींमध्ये शिथिलता आणावी, प्रोत्साहन अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अट रद्द करावी तसेच सन २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ लाभ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय एक रुपयात पीक विमा योजना पुन्हा सुरू करावी, शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांचे वेळेत नूतनीकरण करावे तसेच पेरणीपूर्वी आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

रफीक सिद्दीकी यांनी सांगितले की, सततच्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान आणि कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या कमी भावामुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटातून जात आहेत. त्यामुळे शासनाने शेतकरी हिताचा विचार करून कोणत्याही जाचक अटींशिवाय त्यांना दिलासा द्यावा. यावेळी प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, फिरोज खान, अल्ताफ खान, सरला ताई वरगत, बाबासाहेब घुमरे, अहमद साहेब, ॲड. संदीप तायडे,शाहिद सिद्दीकी तसेच जॉन्सन वरगत यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली की, शेतकऱ्यांच्या या मागण्या व जनभावना महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारपर्यंत पोहोचवून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून ते संबंधित स्तरावर पाठविण्याचे आश्वासन दिले.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार दि. १२ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## बालमजुरीमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा!

**अकोला :** बालकांचे हक्क सुरक्षित ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. बालमजुरीमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, तसेच महिला व बालविकास विभागाने केले आहे. दरवर्षी १२ जून हा दिवस जगभरात 'जागतिक बालमजुरी विरोधी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

# महावितरण कर्मचाऱ्यांची मनमानी ! खाजगी कामगारांच्या खांद्यावर अख्ख्या गावाचा भार

प्रतिनिधी १२ जून

**अडगाव बु. :** सध्या येथील महावितरण कार्यालयाचा कारभार रामभरोसे असून, शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनमानी आणि मुजोर कारभारामुळे परिसरातील शेतकरी व नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, ज्यांच्या खांद्यावर गावाच्या वीज पुरवठ्याची जबाबदारी आहे, ते सरकारी कर्मचारी महावितरणच्या वातानुकूलित केबिनमध्ये आराम फरमावत आहेत. अडगाव महावितरण ऑफिसचे विजय गोरे हे प्रभारी इंजिनिअर गोडबोले यांच्या पेक्षा मोठ्या पोस्ट वर असल्यागत वागतात हे विशेष. अख्ख्या अडगावच्या वीज वितरणचा भार मात्र अननुभवी खाजगी कंत्राटी कामगारांच्या खांद्यावर सोडून देण्यात आला आहे.




शेतात वीज नाही म्हणून पिके जळत आहेत आणि येथील अधिकारी साधी दखलही घ्यायला तयार नाहीत.'

अडगाव बु. येथील महावितरणचा हा सावळागोंधळ थांबवण्यासाठी आता प्रभारी इंजिनिअर गोडबोले साहेबांनी तातडीने या प्रकरणात वैयक्तिकरीत्या लक्ष घालण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. गोडबोले यांनी स्वतः या कार्यालयाची झाडाझडती घेऊन, कर्तव्यात कसुरी करणाऱ्या आणि शेतकऱ्यांना उद्धट वागणूक देणाऱ्या मुजोर कर्मचाऱ्यांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी अडगाव परिसरातील शेतकरी करीत आहेत.

### शेतकऱ्यांना उद्धट वागणूक; तक्रार करायची कुठे?

अडगाव बु. येथील महावितरण कार्यालयात आपल्या न्याय्य मागण्यांसाठी किंवा विजेच्या तक्रारी घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांना येथील कर्मचाऱ्यांकडून अत्यंत उद्धट आणि अपमानकारक वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. 'आम्हाला वरूनच आदेश नाहीत', 'कामगार नाहीयेत', अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन शेतकऱ्यांना हाकलून लावले जाते. अन्नदात्याशी अशी वर्तणूक करणाऱ्या या कर्मचाऱ्यांवर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### शेतकरी वाऱ्यावर, कर्मचारी एसीत!

सध्या शेतीचा हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांना विजेची अत्यंत गरज आहे.
कुठे रोहित्र जळाले आहे, तर कुठे तारा तुटल्या आहेत. अशा ऐन गरजेच्या वेळी महावितरणचे कर्मचारी मात्र कार्यालयातून बाहेर पडायला तयार नाहीत. 'शेतकरी वाऱ्यावर आणि कर्मचारी एसीत' अशी संतप्त प्रतिक्रिया सध्या अडगावमधील शेतकरी वर्गातून उमटत आहे.
शेतातील विजेचे प्रश्न घेऊन गेलेल्या शेतकऱ्यांना ताटकळत ठेवणे हा येथील कर्मचाऱ्यांचा नित्याचाच नियम झाला आहे.

## नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर यशस्वी उपचार




४० वर्षात हजारो रुग्ण रोगमुक्त, रुग्णांचे अनुभव हेच आहेत

प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** येथील प्रसिद्ध 'डॉ. नाईक होमिओपॅथी'मध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, आर्थरायटिस (सांधेदुखी) आणि मायग्रेनसारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी व आनंदी जीवन जगत आहेत. येथील 'ॲडव्हान्स होमिओपॅथी' उपचारांमुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जातात. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही काहीही फरक पडलेला नाही, त्यांनी एकदा या केंद्राला नक्की भेट दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, अथवा आणि त्यांच्या Naikhomoeopathy.com (Youtube) युट्युब चॅनेलवरही अधिक माहिती मिळवू शकतात.येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या आरती नावाच्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव शेअर करताना सांगितले.

नाईक होमिओपॅथीमध्ये 'ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट' सुरू केल्यानंतर अवघ्या ३ महिन्यांतच रुग्णांना खूप मोठा फरक जाणवला.रुग्णाचे वजन ६ किलोने कमी झाले असून मला खूप हलके वाटत आहे. मी या उपचारांमुळे पूर्णपणे समाधानी आणि आनंदी आहे.'

## रतनलाल प्लॉट चौकात रक्ताचा सडा; हायव्होल्टेज ड्रामा एटीएम फोडले

प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** रतनलाल प्लॉट येथे एटीएममध्ये एका मद्यधुंद व्यक्तीने अक्षरशः तांडव घातला. दारूच्या नशेत धुत्त असलेल्या एका व्यक्तीने थेट एसबीआय एटीएममध्ये घुसून तोडफोड केली आहे. केवळ तोडफोडच नाही, तर या थरारात संबंधित व्यक्ती रक्ताने माखली असून एटीएम व बाजुच्या मेडिकल परिसरात रक्ताचा सडा पडला होता.



या धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण रतनलाल प्लॉट परिसरात एकच खळबळ उडाली आहे. रतनलाल प्लॉट परिसरातील 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या एटीएममध्ये आज दुपारच्या सुमारास एक असा थरार घडला, ज्याने पाहणाऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला. एक व्यक्ती प्रचंड मद्यधुंद अवस्थेत या एटीएममध्ये दाखल होते. डोक्यात कसलीतरी नशा आणि अंगात संचारलेलं अघोरी बळ... या नशेत त्या व्यक्तीने थेट एटीएमच्या काचांवर आपल्या हाताने जोरदार प्रहार करायला सुरुवात केली! घाव इतके भीषण होते की, एटीएमच्या जाडजूड काचा जागच्या जागी चक्काचूर झाल्या. पण या धुमाकुळात काचेचे तीक्ष्ण तुकडे त्या मद्यधुंद व्यक्तीच्या हाताला गंभीरपणे टोचले. रक्तवाहिन्या फुटल्या आणि बघता बघता संपूर्ण एटीएम परिसर रक्ताने माखला. घटना घडताच स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता तात्काळ एटीएमकडे धाव घेतली. त्या हिंसक बनलेल्या मद्यधुंद व्यक्तीला नागरिकांनी शिताफीने ताब्यात घेतले. या संपूर्ण तांडवात एटीएममधील इतर कोणत्याही नागरिकाला किंवा ग्राहकाला दुखापत झालेली नाही. मात्र, या हायव्होल्टेज ड्रामामुळे रतनलाल प्लॉट चौक परिसरात बराच वेळ तणावाचे वातावरण होते.

## अवजारांसाठी महाडीबीटीवर अर्ज करा!

**अकोला :** राज्यात केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प या योजना महाडीबीटी पोर्टलवर राबविल्या जात आहेत. महाडीबीटी प्रणालीवर ट्रॅक्टर चलित अवजारे, पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्र अवजारे, पीक संरक्षण साधने मनुष्य व बैल चलित अवजारे, प्रक्रिया युनिट भाडे तत्त्वावर कृषी यंत्र व अवजारे सेवा पुरवठा केंद्राची उभारणी अवजारे बँक, इतर यंत्र सामग्रीकरिता ५० टक्के अनुदान मर्यादा व मार्गदर्शक सूचनेनुसार जे कमी असेल ते या बाबीच्या लाभासाठी महाडीबीटी या वेबसाईटवर जाऊन अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त अर्ज करावे.

## शिरताळा येथे सभामंडपास मंजुरी दिल्याबद्दल खा. अनुप धोत्रे यांचा सत्कार

**मूर्तिजापुर :** तालुक्यातील गट ग्राम पंचायत शिरताळा येथील ग्रामस्थ अनेक वर्षा पासुन सभा मंडपाची मागणी करत होते. अनेक वेळा संबधीत प्रशासन व लोकप्रतिनिधीना निवेदने दिली. समाजसेवक संजय थेटे, पुरषोत्तम हेंडसकर, गावकरी दोन वर्षापासुन प्रयत्न करत होते. खासदार अनुप धोत्रे यांनी ग्रामस्थांची मागणी मान्य केली.



शिरताळा गावास सभामंडप देण्यास मंजुरी दिली. त्यामुळे समाज सेवक संजय थेटे, पुरुषोतम काका हेंडसकर, गावतील नागरिक यांनी खा. अनुप धोत्रे यांच्या निवासस्थानी भेट घेवून शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व आभार व्यक्त केले. यावेळी गणेश बांबल, अंजली बांबल, ज्योती वानखडे, छाया बांबल, थेटे ताई, गावा तील महिला पुरुष उपस्थित होते.

## तामशी येथे खरीप पूर्व शेतकरी मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या तसेच डॉ.एस.एस. माने, संशोधन संचालक यांच्या मार्गदर्शनात व प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अनिता चोरे यांच्या नियोजनातून शेतकरी शास्त्रज्ञ मंच व खरीप पूर्व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. खताचा संतुलित वापर या विषयास अनुसरून सुरु असलेल्या राष्ट्रीय मोहिमे अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन ०८ जून रोजी कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि जल व मृद संधारण अभियांत्रिकी विभाग डॉ. पं दे. कृ. वि. अकोला अंतर्गत तामशी, तालुका-बाळापुर, जिल्हा-अकोला येथे खरीप पूर्व शेतकरी मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. राजेश पातोडे (विभाग प्रमुख आणि वरीष्ठ शास्त्रज्ञ जल व मृद संधारण अभियांत्रिकी), डॉ. एम. एम. गणवीर (वरीष्ठ शास्त्रज्ञ कृषीवि?द्या), आनंदा पातोडे, सरपंच तामशी, भगवान पातोंड उप-सरपंच तामशी, हर्षद आंबेरे, नगरसेवक, मनपा, अकोला, विजय महानकर, माजी सरपंच (पिंपळगाव) प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमास



तामशी गावाचे सर्व शेतकरी व महिला यांची बहुसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस हारार्पण तसेच दीप प्रज्वलन करून करण्यात आली. रविकिरण माळी (एस.आर.एफ) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांनी जैविक बीज प्रक्रियाचे महत्व व जैविक बीज प्रक्रिया करण्याची पद्धत या बद्दल शेतकर्यांना माहिती दिली. डॉ. एम. एम. गणवीर यांनी माती परीक्षण करणे व मृदा आरोग्य पत्रिके नुसार शिफारशीत खत मात्रेचा वापर करणे, शेणखताचा वापर, कंपोष्ट खत तयार करण्याच्या पद्धती व हिरवळीचे खत या बद्दल शेतकऱ्यांना तंत्रज्ञान अवगत करून दिले. त्यांनी कोरडवाहू शेती मधील आपात्कालीन पिक नियोजनाबद्दल व आंतरपीक पद्धती बद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. कृषी विभागाचे 'महाविस्तार एप शेतकऱ्यांनी मोबाईल मध्ये डाउनलोड करून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. राजेश पातोडे यांनी शेतकऱ्यांना एल-निनो व त्याचा पाऊसमानावर होणारा परिणाम या बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन व जैविक बांध या बद्दल सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. पावसातील दीर्घकाळ खंड पडल्यानंतर मुल्स्थानी जलसंधारणाचे उपाय व अतिरिक्त पाऊस झाल्यास निचरा चर कशा पद्धतीने करावे या बददल शेतकऱ्यांना मार्गदशन केले. याप्रसंगी हर्षद आंबेरे व विजय महानकर यांनी शेतीविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन विशाल पंडागळे यांनी केले. यशस्वी करण्यासाठी पवन फुकट व तामशी येथील गावकरी यांनी परिश्रम घेतले.

## पंडित सुदर्शनजी शर्मा यांचे भागवत कथेत निरूपण

# कृष्णाच्या आगमनाने गोकुळात आनंदोत्सव

◆ दत्त कॉलनीतील 'गोकुल धाम' मध्ये भाविकांची अलोट गर्दी





प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** पुरुषोत्तम मासानिमित्त कै. पुंडलिकराव बंकटराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ येथील दत्त कॉलनीतील 'गोकुल धाम' मध्ये श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या कथेचे पाचवे पुष्प गुंफताना सुप्रसिद्ध कथाकार पंडित सुदर्शनजी शर्मा यांनी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांचे अत्यंत सुंदर आणि रसाळ वर्णन केले. कृष्णाच्या आगमनाने गोकुळात कसा आनंदोत्सव साजरा झाला आणि नंदबाबा-यशोदेचा आनंद गगनात कसा मावेनासा झाला, हा प्रसंग त्यांनी भाविकांसमोर जिवंत केला.

कथेच्या सुरुवातीला मुख्य यजमान पंकज देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख आणि सौ. कल्पनाताई देशमुख यांनी भागवत ग्रंथाचे मनोभावे पूजन केले. तसेच व्यासपीठावर विराजमान कथावाचक पंडित सुदर्शनजी शर्मा यांचे स्वागत केले. या धार्मिक सोहळ्याला परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गिरीराज पूजन आणि महाआरती

पाचव्या दिवसाच्या कथेचे मुख्य आकर्षण म्हणजे 'गोवर्धन उत्सव'. कृष्णाने गोकुळवासीयांचे इंद्राच्या कोपापासून रक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर उचलून धरला, हा विलोभनीय देखावा यावेळी सादर करण्यात आला. या प्रसंगी यजमान प्रदीप देशमुख, सौ. कल्पनाताई देशमुख, पंकज देशमुख आणि सौ. ऋतुजा देशमुख यांनी गिरिराज गोवर्धनाचे विधिवत पूजन केले. त्यानंतर महाआरती करण्यात आली आणि महाप्रसादाने कथेची सांगता झाली. मोठ्या संख्येत भाविकांची उपस्थिती होती.



### बाललीला आणि असुरांचा वध

पंडितजींनी कथेत पुढे सांगितले की, कंसाने देवकीच्या सात अपत्यांचा वध केला, तर आठवे अपत्य म्हणून आलेली मुलगी आकाशात निघून गेली. पुढे वसुदेवांच्या सांगण्यावरून नंदबाबा मथुरेला कर भरण्यासाठी गेले असता, कंसाला देवकीच्या आठव्या अपत्याबाबत शंका आल्याची कुणकुण लागली. वसुदेवांनी सावध केल्यामुळे नंदबाबा तातडीने गोकुळात परतले. यानंतर कृष्णाला मारण्यासाठी कंसाने पाठवलेल्या विविध असुरांच्या वधाचे प्रसंग पंडितजींनी अत्यंत प्रभावीपणे मांडले. कपटाने दूध पाजण्यासाठी आलेल्या पुतना राक्षसिणीचा हेतू ओळखून बालकृष्णाने तिचे प्राण हरण केले. अंतसमयी पुतनेने मूळ रूप धारण केले, ज्याच्यावर गोकुळवासीयांनी अंत्यसंस्कार केले. कंसाने पाठवलेल्या उत्तकच असुरालाही कान्हाने यमसदनास पाठवले. वृंदावनात आल्यानंतर कान्हाने मायावी वासरू आणि बकासुराचा वध केला. अजगर बनून आलेल्या अघासुराचा संहार केला, तर तालवनात बलरामाने धेनुकासुराचा वध करून गावकऱ्यांना भयमुक्त केले. यमुना नदी विषारी करणाऱ्या कालिया नागाचा गर्वहरण करून कृष्णाने त्याला रमणद्विपावर जाण्यास भाग पाडले.

### नंदबाबांचा वृंदावनाला जाण्याचा निर्णय

कान्हाच्या खोड्या दिवसेंदिवस वाढत होत्या. गोपाळांची टोळी घराघरात घुसून लोणी खाणे, गाईंच्या वासरांना वेळेआधीच सोडून देणे अशा तक्रारी घेऊन गोपी यशोदा मैय्याकडे येत असत. 'असेच सुरू राहिले तर कान्हा बिघडेल' या काळजीपोटी नंदबाबांनी गोकुळ सोडून गोवर्धन पर्वत आणि यमुनेच्या सुंदर परिसरात म्हणजेच वृंदावनात (नंदगाव, बरसाना) स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. कथा ऐकताना राजा परीक्षिताने शुकदेवांना विचारले की, 'यशोदा मैय्याने असे कोणते पुण्य केले होते, ज्यामुळे तिला साक्षात भगवंताची आई होण्याचे सौभाग्य लाभले?' त्यावर शुकदेव म्हणाले, 'हे त्यांच्या पूर्वजन्मीच्या अथांग तपस्येचे फळ आहे.' याच दरम्यान पंडितजींनी सुखीया माळीणची फळांची टोपली कान्हाने हिरे-माणकांनी कशी भरली, हा प्रसंग सांगून भाविकांना मंत्रमुग्ध केले.



# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. १२ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# चातारी गावात कालव्याचे पाणी शिरल्याने गोंधळ

प्रतिनिधी १२ जून

**उमरखेड :** चातारी गावात कालव्याचे अचानक मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे गावात गोंधळ निर्माण झाला असून, अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने ग्रामस्थांची धावपळ उडाली. झोपडपट्टी भागातही पाणी घुसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला.

पाटबंधारे विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार कुणीतरी अज्ञात व्यक्तीने कालव्याचे गेट उघडल्याने पाण्याचा विसर्ग वाढला. हे पाणी गावालगतच्या तळ्यात पोहोचले आणि पुढे गावाच्या मध्यभागातून वाहत थेट काही घरांमध्ये शिरले.

चातारी गाव नदीकाठावर असूनही अनेक भागात पिण्याच्या पाण्याची समस्या कायम आहे. अशा परिस्थितीत अचानक आलेल्या पाण्यामुळे काही भागांत नागरिकांना दिलासा मिळण्याऐवजी नुकसान सहन करावे लागले. गावात दरवर्षी पावसाळ्यात उंचवडद पांदण, खरूस पांदण आणि साखरापांदण परिसरातून मोठ्या प्रमाणात पाणी गावात येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जातात. मात्र, या समस्येकडे अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरवर्षी सुमारे ७० ते ९० घरांमध्ये पाणी घुसून संसारोपयोगी साहित्याचे नुकसान होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. दरम्यान, नुकसान झालेल्या कुटुंबांना प्रशासनाकडून काही वेळा आर्थिक मदत दिली जाते, मात्र कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याची तक्रार स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. कालव्याचे पाणी गावात कसे आणि कोणी सोडले, याबाबत प्रशासनाकडून चौकशी सुरू असून, दोषींवर कारवाई करण्यात येईल असेही सांगण्यात आले आहे.



# बोरी–चातारी रेतीघाटात अवैध उत्खनन

प्रतिनिधी १२ जून




**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील बोरी–चातारी रेतीघाटातून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या संपूर्ण प्रकरणाची प्रत्यक्ष मोजणी करून जबाबदार व्यक्तींवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद देवसरकर यांनी केली आहे. त्यांनी याबाबत उमरखेड तहसीलदारांना लेखी निवेदन सादर केले आहे.

देवसरकर यांच्या म्हणण्यानुसार, बोरी–चातारी रेतीघाट हा लिलाव न झालेला घाट असतानाही येथे संगनमताने मोठ्या प्रमाणात रेतीचे उत्खनन करण्यात आले. अंदाजे ५० हजार ब्रास रेती अवैधरीत्या काढून ती बाहेर नेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकारामुळे नदीपात्राचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण झाले असून, जेसीबीच्या साहाय्याने नदीत खोल खड्डे पाडण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत काही महसूल कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखालीच रेती तस्करी सुरू असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. संपूर्ण उत्खनन हंगामभर सुरू राहिले असून, वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, असे देवसरकर यांनी स्पष्ट केले आहे. यापूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ आणि उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांकडेही तक्रारी केल्या होत्या, मात्र त्याची दखल घेतली गेली नसल्याचे ते म्हणतात. तसेच, दिघी रेतीघाटाच्या नावाखाली बोरी–चातारी हद्दीतील रेतीचा मोठ्या प्रमाणात वापर करून चुकीच्या पद्धतीने उत्खनन झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. यामुळे शासनाचा महसूल बुडाल्याचा दावा करत, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, काही तक्रारींच्या अनुषंगाने तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालात बोरी–चातारी घाटातून उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तरीही प्रत्यक्षात कारवाई न झाल्याने तस्करी सुरूच राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात एलसीबी पथकानेही काहीवेळा कारवाईचा प्रयत्न केला होता, मात्र महसूल प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. देवसरकर यांनी मागणी केली आहे की, पावसाळा सुरू होण्यापूर्वी नदीपात्राची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी आणि संपूर्ण उत्खननाची मोजणी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी. अन्यथा या प्रकरणाची व्याप्ती अधिक वाढू शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या निवेदनाची प्रत विभागीय आयुक्तांकडेही पाठवण्यात आली आहे. दरम्यान, तहसीलदार आर. यू. सुरडकर यांनी या तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ मोजणी करण्यासाठी संबंधितांना पत्रव्यवहार करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे समजते.

# दिग्रस येथे 'आरोग्य संकल्प अभियान' अंतर्गत भव्य मोफत आरोग्य शिबिर

प्रतिनिधी १२ जून

**दिग्रस:** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त 'रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा' या संकल्पनेतून दिग्रस येथे 'आरोग्य संकल्प अभियान' अंतर्गत भव्य मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया, उपचार व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मा. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने तसेच दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर रविवारी, १४ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत दिनबाई विद्यालय, दिग्रस येथे पार पडणार आहे.



या शिबिरात अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांकडून हृदयविकार, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, हृदयरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मुखरोग तसेच मूत्ररोग आदी विविध आजारांची मोफत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महिलांसाठी ब्रेस्ट कॅन्सर (मेमोग्राफी) तपासणी, विविध प्रकारच्या कॅन्सरची तपासणी, पॅप स्मिअर चाचणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स तपासणी, किडनी तपासणी तसेच ईसीजीसह विविध आरोग्य चाचण्या करण्यात येणार आहेत. शिबिरामध्ये तपासणीनंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील उपचार, शस्त्रक्रिया व विशेष वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार असून अनेक उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यासोबतच नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड काढण्याची सुविधाही शिबिरात उपलब्ध राहणार आहे. यासाठी लाभार्थींनी आधार कार्ड, रेशन कार्ड व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. दिग्रस, दरव्हा आणि नेर विधानसभा मतदारसंघातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आरोग्य सुविधा सामान्य नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर परिसरातील नागरिकांसाठी वरदान ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# शस्त्रासह दोन गट आमनेसामने

प्रतिनिधी १२ जून

**पांढरकवडा:** ताडउमरी गावाजवळ दोन गटांतील युवक तलवारी, लोखंडी रॉड व लाठ्यांसह आमनेसामने आल्याची घटना उघडकीस आली असून, पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे संभाव्य रक्तपात टळला. या प्रकरणी दोन्ही गटांतील १२ आरोपींना अटक करण्यात आली असून दोन तलवारी, लोखंडी रॉड, लाकडी काठ्या आणि मोटारसायकली असा सुमारे २ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

९ जून रोजी दुपारी ताडउमरी गावाजवळ दोन गटांतील काही युवक शस्त्रांसह जमल्याची माहिती मिळताच पांढरकवडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यामुळे मोठा हिंसक संघर्ष टळला. या प्रकरणात आकीब बेग अफाज बेग मिर्झा यांच्या फिर्यादीवरून करण शिंदे, सुजित वानखेडे, शेख समीर शेख चाँद, पार्थ शेटे, आशिष बेहेरे, साईराम आगरकर आणि एका अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. तर सुजित वानखेडे यांच्या फिर्यादीवरून आकीब ऐहफाज मिर्झा, नाझीम ऐहफाज मिर्झा, चिरंजीव लेंगुरे, सैयद अदनाम अली आणि अनुप राजू कनाके यांच्याविरुद्धही विविध कलमे व शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे नोंदवून अटक करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणातील करण शिंदे आणि सुजित वानखेडे यांना यापूर्वी जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले होते. तडीपार आदेशाचे उल्लंघन करून ते यवतमाळ जिल्ह्यात आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या नेतृत्वाखाली नितीन सुशीर, विलास जाधव, रजनीकांत पाटील, सुनील राठोड, सचिन काकडे, राजू मुत्तलवार, विशाल वाढई व विजय राठोड यांनी कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

# नरेंद्र मोदींच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती

प्रतिनिधी १२ जून





**दिग्रस :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या कार्यकाळाला १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दिग्रसमधील श्री वडकेश्वर महादेव मंदिरात भारतीय जनता पक्षातर्फे बुधवारी (ता. १०) महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

भाजपने 'विश्वास, विकास आणि लोककल्याणाची १२ वर्षे' तसेच 'राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती' या संकल्पनेवर देशव्यापी अभियान सुरू केले आहे. त्याला प्रतिसाद म्हणून शहराध्यक्ष अभय इंगळे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये भाजपा व्हीजीएनटी सेलचे जिल्हाध्यक्ष मनोज राठोड, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. गजानन निचत, एसआयआर प्रमुख अरुण राठोड, अनिल भरारे तसेच शहर कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता. महाआरतीनंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. तसेच स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी २१ जूनपर्यंत विशेष जनसंपर्क अभियान राबविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमास सतीश मेहता, जागृती मेहता, मंदा श्रीवास, कल्पना पवार, विष्णू राठोड, सतीश बनगीनवार, वाजिद शेख, संतोष मांजरखेडे, अमित चिद्दरवार, संजय घरत, सुभाष काटेकर, प्रमोद बनगीनवार, विलास चव्हाण, राजेश राठोड यांच्यासह भाजप पदाधिकारी व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फेरीवाला कायदा पूर्ण अंमलबजावणीपर्यंत अतिक्रमण हटाव मोहीम स्थगित करा – ॲड. सचिन नाईक

प्रतिनिधी १२ जून



**पुसद :** पुसद शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे लहान व्यावसायिक, हातगाडीधारक, फेरीवाले व सर्वसामान्य नागरिकांच्या उदरनिर्वाहावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप करत ॲड. सचिन नाईक यांनी फेरीवाला (पथ विक्रेता) कायदा २०१४ ची पूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत ही मोहीम स्थगित करण्याची मागणी केली आहे.

केंद्र शासनाचा फेरीवाला (पथ विक्रेता) कायदा २०१४ हा पथ विक्रेत्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार टाउन व्हेंडिंग कमिटीची स्थापना, सर्वेक्षण, पात्र विक्रेत्यांची नोंदणी, ओळखपत्र वितरण तसेच विक्री क्षेत्रांचे नियोजन होणे आवश्यक आहे. मात्र या प्रक्रिया पूर्ण न करता अतिक्रमण हटाव कारवाई करणे अन्यायकारक असल्याचे मत नाईक यांनी व्यक्त केले. या संदर्भात ११ जून रोजी महाविकास आघाडीच्या वतीने उपविभागीय अधिकारी तसेच नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. फेरीवाला कायद्याची संपूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत अतिक्रमण हटाव मोहीम तात्काळ स्थगित करावी, तसेच सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून न्याय्य व पारदर्शक धोरण राबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे.

या निवेदनावर नगरसेवक ॲड. भारत जाधव, शिवसेनेचे मोहन विश्वकर्मा, सय्यद इस्तियाक, नगरसेवक ॲड. वसीम अहमद, शहराध्यक्ष झिया शेख, विजय बाबर, तहेसीन खान, गाझी उसामा, फिरोज खान, प्रकाश नेमायते यांच्यासह फळ-भाजी विक्रेते व किरकोळ विक्रेता संघांचे अकील बागवान, तसलीम खान, प्रेम गोवर्षेट्टीवर, गजानन गायकवाड, दशरथ जवादे, मोहम्मद फारूक, सौ. अरुणा उमाकांत पांडे, अमन खान, विलास जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विकासाच्या नावाखाली वृक्षतोड

## पर्यावरण प्रेमींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १२ जून



**उमरखेड :** शहराच्या विकासकामांसाठी रस्ते रुंदीकरण आणि इतर प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू असताना उमरखेड परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महामार्ग आणि शहरालगतच्या रस्त्यांवरील अनेक जुनी व मोठी झाडे तोडली जात असल्याने पर्यावरणप्रेमी आणि वृक्षसंवर्धन संस्थांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. विकासकामांच्या नावाखाली रस्त्यांच्या दुतर्फा उभ्या असलेल्या शेकडो वृक्षांची कत्तल सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एकीकडे वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाचे कार्यक्रम राबविले जात असताना दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. उमरखेडमध्ये विविध सामाजिक संस्था आणि वृक्षसंवर्धन समित्या कार्यरत असल्याचा दावा केला जातो. मात्र, वृक्षतोडीच्या घटनांवर या संस्था सार्वजनिकरीत्या भूमिका घेताना किंवा आंदोलन करताना दिसत नसल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. त्यामुळे या संस्था केवळ वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. वाढत्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त होत असून उष्णतेत वाढ, भूजल पातळीवर परिणाम आणि जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता पर्यावरण अभ्यासकांकडून व्यक्त केली जाते. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी वृक्षतोडीची पडताळणी करून नियमांचे पालन होत आहे का, याची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### वृक्षतोडीचा आरोप

नियमांनुसार वृक्षतोड करण्यापूर्वी संबंधित विभागांची परवानगी घेणे आवश्यक असते. शहरी भागात नगर परिषद, तर ग्रामीण भागात ग्रामपंचायत, पंचायत समिती, वन विभाग व पर्यावरण विभाग यांच्या मंजुरीनंतरच वृक्षतोड केली जाऊ शकते. मात्र, काही ठिकाणी आवश्यक परवानग्या न घेता वृक्षतोड होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई; १५ जूनपर्यंत विशेष मोहीम

## वाहतूक कोंडीसह सुरक्षेचे प्रश्नही ऐरणीवर

प्रतिनिधी १२ जून

**महागाव :** महागाव बसस्थानक परिसरात वाढलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष कारवाई मोहीम सुरू केली आहे. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील 'नो पार्किंग झोन'मध्ये अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ५ ते १५ जूनदरम्यान कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

महागाव, उमरखेड, पुसद व फुलसांगवी मार्गांवर खाजगी चारचाकी आणि तीनचाकी वाहनांतून मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक वाहने थेट बसस्थानक परिसरात थांबवून प्रवासी उचलत असल्याने वाहतूक कोंडीसह सुरक्षेचे प्रश्नही निर्माण होत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात होत असलेल्या घटीस अवैध प्रवासी वाहतूक हे एक प्रमुख कारण असल्याचे निरीक्षण नागपूर खंडपीठाने जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान नोंदविले होते. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता विभागाने राज्यभर विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. महागाव बसस्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राजवळ तसेच बसस्थानक प्रवेशद्वार परिसरात खाजगी वाहनांची गर्दी वाढल्याचे दिसून येत आहे. काही वाहनचालकांकडून कमी भाड्याचे आमिष दाखवून प्रवासी आकर्षित केले जात असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या सहकार्याने संयुक्त कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर दंडात्मक




कारवाई केली जाईल, असे महागाव बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक बापूजी पारवेकर यांनी सांगितले. या मोहिमेमुळे अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर शेंबाळपिंपरीच्या सुपुत्राची भारतीय सेनेत निवड

प्रतिनिधी १२ जून



**पुसद :** शेंबाळपिंपरी येथील हमाली व मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे रफीकोदीन सिद्दीकी यांचे सुपुत्र समीरोदीन सिद्दीकी यांची भारतीय सेनेत जवान म्हणून निवड झाल्याबद्दल गावात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत सभागृहात समस्त गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतून पुढे येत, सातत्यपूर्ण मेहनत आणि कठोर प्रशिक्षणाच्या जोरावर समीरोदीन सिद्दीकी यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. असे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुल सिद्दीकी यांनी सांगितले की, कठीण परिस्थिती असूनही ध्येयापासून न हटता केलेल्या परिश्रमामुळे हे यश शक्य झाले. समीरोदीन यांचा आदर्श पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. अध्यक्षस्थानी सरपंच तथा प्रशासक रविंद्र महल्ले होते. प्रमुख अतिथी म्हणून अर्जुन गवई, डॉ. राहुल सिरसाट, राजेंद्र साकला, डॉ. अजित चंदेल, गोपाल मोरे आणि गौतम वाहुळे उपस्थित होते. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. संचालन राजेश वाहुळे यांनी केले. प्रास्ताविक वसीम सिद्दीकी यांनी तर आभार बापुराव कांबळे यांनी केले.

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. १२ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हा परिषद वित्त आयोगामार्फत थिलोरी ग्रामपंचायतीला ई-रिक्षा भेट

**दर्यापूर:** केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या स्वच्छता अभियानाला बळकटी देण्यासाठी ग्रामपंचायती स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद वित्त आयोगामार्फत गावांमध्ये ओला व सुका कचरा संकलन व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी ई-रिक्षांचे



वितरण करण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत दर्यापूर तालुक्यातील थिलोरी ग्रामपंचायतीला ओला व सुका कचरा संकलनासाठी ई-रिक्षा प्रदान करण्यात आली. या ई-रिक्षाचे उद्घाटन ग्रामपंचायतीच्या सरपंच मीनाताई शशांक धर्माळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आले.

# मान्सूनपूर्व पूर आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती:** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उद्भवू शकणाऱ्या पूर परिस्थितीचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिष येरेकर यांच्या आदेशाने मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ ) नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथक, जिल्हाधिकारी कार्यालय , अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या थरारक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संतोष काकडे




### ◆ मालखेड तलावावर रंगीत तालीम संपन्न

यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड तलाव येथे जिल्हास्तरीय पूर आपत्ती व्यवस्थापन रंगीत तालीम (मॉकड्रिल) पार पडली. या रंगीत तालीमीदरम्यान पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवणे आणि पूर परिस्थितीमुळे घरांची पडझड किंवा इतर आपत्ती ओढवल्यास शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून जीवितहानी कशी टाळायची, याचे थेट सादरीकरण करण्यात आले. विशेषतः ग्रामीण भागात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास ती स्थानिक पातळीवर कशी हाताळावी, याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण एनडीआरएफ नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथकातील तज्ज्ञांनी विविध प्रात्यक्षिकांद्वारे दिले. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत महसूल, पोलीस आणि आरोग्य विभागातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काय असाव्यात, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या मोहिमेत चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, गटविकास अधिकारी, संबंधित कर्मचारी आणि आरोग्य यंत्रणेने सक्रिय सहभाग घेतला.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, चांदूर रेल्वेचे नायब तहसीलदार अनिल चौरे, पोलीस निरीक्षक श्री. मिश्रा, पोलीस निरीक्षक श्री. यादव, एनडीआरएफ नागपूरचे डॉ. झा, मुंबई मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग कचोरी, महसूल अधिकारी प्रमोद शिरसाठ, तलाठी दीपक चव्हाण, आरोग्य यंत्रणेचे डॉ. अविनाश पवार, प्रीती पवार, सौरव पाठक, मनोज माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सचिन धरमकर, विशाल लिमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, प्रतिक कडू, नारायण दवंगे, अशोक निंबरते तसेच 'आपला मित्र' संस्थेचे तुषार गोंडाणे व अमोल गोंडाणे यांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून शौर्यपूर्ण बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी केले.

## महापालिकेच्या पथकाने एका महिलेला रेस्क्यू करून काढले विहिरी बाहेर

प्रतिनिधी १२जून

### ◆जीव वाचवला ◆अमरावतीत खळबळ

**अमरावती :** विहिरीत पडलेल्या महिलेला महापालिकेच्या अग्निशामक विभागाने रेस्क्यूपथकाने तातडीने घटनास्थळी जाऊन विहिरी बाहेर काढले त्यामुळे सदर महिलेचा जीव वाचला आहे. ही घटना १२ जून रोजी पहाटे ०६.४५ वा.-पंचीबाई यांची वाडी, महाजनपुरा भातकुली रोड येथे घडली. यासंदर्भाची माहिती लोकांनी पोलीस व महापालिका दिली होती पोलीस कंट्रोल रूम येथून अग्निशमन मुख्यालय फोन द्वारे माहिती दिली की, पंचीबाई यांची वाडी, महाजनपुरा भातकुली रोड एक महिला



विहिरीत पडली आहे. तसेच अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे व पाळी प्रमुख यांचे आदेशानुसार फायर लॉरी क्रमांक श्प् २७ँ ७८०३ वाहन चालक निलेश आजणे ,संजय चव्हाण.फायरमन मनीष उताणे राहुल घोडे,अमोल निस्ताने, मोहम्मद ताहीर तात्काळ घटनास्थळी रवाना. घटनास्थळी पोचल्यावर पोलीस व नागरिकांचा मोठा जमाव विहिरी भोवती जमा झालेला होता. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काल रोप लाड्डे सहाय्याने , अग्निशमन दलातील जवान फा.राहुल घोडे व इतर साथीदारांच्या मदतीने विहिरीत उतरले व त्या महिलेच्या कमरेला रोप( दोर) बांधून.रोप ंें च्या साह्याने सुखरूप वरती काढण्यात आले. विहिरीत पडलेल्या महिलेचे नाव आशा सुरेश दुधे ,वय ५८ वर्ष . राहणार कांचन विहार गडगडेश्वर मंदिराच्या पाठीमागे राहणार असू सध्या त्यांना शासकीय इस्पितळात वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणा करत आहे. या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. रेस्क्यू करण्यासाठी वाहन चालक,निलेश आजणे संजय चव्हाण फायरमन मनीष उताणे, राहुल घोडे अमोल निस्ताने मोहम्मद ताहीर यांचा समावेश होता.

## अवैध गांजा विक्री करणाऱ्या आरोपी विरुद्ध धडक कारवाई

प्रतिनिधी १२ जून

### ◆ ५.१५६ किलो गांजा जप्त

**अमरावती :** पोलीस स्टेशन धारणी कडुन अवैध गांजा विकी करणा-या आरोपी विरुध्द धडक कारवाई एकुण ९९,४२०/- रुपयाचा एकुण ५.१५६ किलो गांजा जप्त केला.

निकेतन कदम पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांनी अवैदय धंदयावर कारवाई करणे बाबत तसेच अंमलीपदार्थ तस्करीवर धडक कारवाई करण्याचे आदेशित केले आहे. त्याअनुषंगाने दिनांक १०/०६/२०२६ रोजी ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांना मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन येथील पथकाने दुबई मोहल्ला, धारणी येथील खलील अन्सारी कलीम



अन्सारी याचे घरासमोर जावुन पाहणी केली असता खलील अन्सारी कलीम अन्सारी रा. दुबई मोहल्ला, धारणी ता.धारणी जि. अमरावती हा मिळुन आला. त्याचे घरात प्रवेश करुन घराची झडती घेतली असता एका निळया रंगाचे प्लॉस्टीक इममध्ये खाकी रंगाचे चिकट टेपमध्ये गुंडाळलेले पाच काळया हिरव्या रंगाचे पाने, फुले, बिया, देठे सुकलेले उग्र वासाची वनस्पती दिसुन आली. सदर वनस्पती मादक अमंली पदार्थ गांजा (कॅनाबीज) असलेले एकुण ५.१५६ किलो वजनाचे पॅकेट असा ९९,४२०/- रुपयाचा माल मिळुन आला. सदर बाबत धारणी पोलीस ठाणे येथे आरोपी नामे खलील अन्सारी कलीम अन्सारी रा. दुबई. मोहल्ला धारणी याचे विरुध्द कलम ८ (क), २० (ब) ग्ग् (ब) एन.डी.पी.एस. अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचा तपास पोउनि सतिश झाल्टे हे करीत आहेत.

सदरची कारवाई . पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधिक्षक,दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री माधवराव गरुड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षकअवतारसिंग चव्हाण, महिला सपोनि संध्या चव्हाण, पोउनि सतिश झाल्टे सफौ. धिकार, पोहेकॉ सतीश राठोड, पोहेकॉ उईके, पोकॉ आदीत्य, पोकॉ विकास, पोकों कथिलकर, पोकों कासदेकर, पोकॉ रितेश, पोकों सागर, मपोकों वंदना, मपोकों कविता, चापोहेकॉ नितीन लोहकपुरे, चापोहेकॉ मंगेश मानमोडे, तसेच तहसिल कार्यालय धारणी येथिल नायब तहसिलदार राजेश माळी, पंचायत समिती धारणी येथील जितेद्र बारवान व नरेंद्र ठाकरे व इतर कर्मचारी अशांनी केली आहे.

## दिव्यांग बांधवांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा- आ. रवि राणा

प्रतिनिधी १२जून

**अमरावती :** स्मृती सेवाश्रम, नवा अकोला तथा प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दिव्यांग मार्गदर्शन कार्यशाळा' मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली. दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांची माहिती, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आमदार रवि राणा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून मा. श्री. प्रेमकिशोर सिकची उपस्थित होते. यावेळी डॉ. अनिल सावरकर, अविनाश कोठाळे, डॉ. दिलीप काळे, सचिन मालकर, डॉ. गुणवंत डहाणे, गजानन रडके, विजय राऊत, गौरव इंगळे, नितीन




भटकर, हेमंत काळमेघ, शेख अनिस यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ आणि मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन स्मृती सेवाश्रमचे अध्यक्ष प्रकाश भाऊसाहेब साबळे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान आ. रवि राणा यांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थ्यांना २५ दळणकेंद्र (फ्लोअर मिल) व ५० झेरॉक्स मशिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक दिव्यांग बांधवांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार रवि राणा म्हणाले की, ‡दिव्यांग व्यक्तींमध्ये प्रचंड जिद्द, चिकाटी आणि क्षमता असते. समाजाने त्यांच्याकडे केवळ सहानुभूतीच्या भावनेने न पाहता त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या संधींची माहिती प्रत्येक दिव्यांग बांधवापर्यंत पोहोचली पाहिजे.

## प्रतिबंधीत एचटीबीटी कपाशी बियाणे ४३२ पॅकेटचा साठा जप्त

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती :** HTBT (हर्बिसाईड टॉलेरंट बॅसिलस थुरींजियांसिस) या जणुकीय बदल केलेल्या कापसाच्या वाणामुळे पर्यावरणाचा -हास होत असल्याने शासनाने सदरचे कापसाचे वाण प्रतिबंधीत केले असून सुध्दा काही व्यक्ती सदरचे प्रतिबंधीत व प्रमाणित तथा गुणवत्ता नसलेले HTBT चे कापसाचे बोगस बियाणे विक्री करुन शेतक-यांची फसवणुक करीत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रा.) श्री. निकेतन कदम यांच्यामार्फत पोहोचली. त्यामुळे अशा प्रतिबंधीत HTBT कापुस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक सरांनी सर्व ठाणेदारांना आदेशित केले होते.

त्यानुसार दिनांक १०/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन तळेगाव दशासर येथील




पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे पथक पो.स्टे. हद्दीमध्ये गस्त करीत असताना ठाणेदार स.पो.नि.किरण औटे यांना गोपनीय बातमीदार यांचे कडून माहिती मिळाली की, इसम नामे शुभमसिंग बलजितसिंग चौधरी, रा. धामणगाव रेल्वे यांने ग्राम निमगव्हाण, ता. चांदूर रेल्वे शेत शिवारामध्ये राजकुमार व्यंकटराव पर्बत यांचे शेतातील खोलीमध्ये प्रतिबंधीत/अनधिकृत कपाशी (एचटीबीटी कपाशी) बियाण्याची विक्री करीता साठा करुन ठेवला आहे. सदर माहितीची खातरजमा करुन संयुक्त कारवाई करीता हजर राहणे करीता जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले व त्यांचे कडील अधिकारी व कर्मचारी कारवाई कामी हजर आल्याने संयुक्तपणे ग्राम निमगव्हाण शेत शिवारामध्ये राजकुंकुमार व्यंकटराव परबत यांचे शेतातील खोलीमध्ये पंचासह छापा टाकला असता सदर ठिकाणी आरोपी नामे शुभमसिंग बलजितसिंग चौधरी, वय २१ वर्षे रा. धामणगाव रेल्वे हा मिळून आला. तिथे पंचासमक्ष खोलीची पाहणी केला असता सदर ठिकाणी प्रतिबंधीत एचटीबीटी कपाशीचे कोहिनूर ब्रँडचे ५६ पॅकेट, ग्लायको गार्ड ब्रँडचे १४० पॅकेट, विराट ब्रँडचे १५५ पॅकेट, महाराजा ब्रँडचे ८१ पॅकेट असे एकुण ४३२ पॅकेट, प्रति पॅकेट किंमत १६५० रु. असा एकुण ७,१२,८००/- रुपयांचा प्रतिबंधीत एचटीबीटी कपाशीचे बियाणे मिळून आल्याने ते पंचासमक्ष जप्ती पंचनामा करुन जप्त करण्यात आले आहे. रवी महादेवराव राणे, कृषी अधिकारी तथा गुण नियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती चांदूर रेल्वे यांचे फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द पो.स्टे. तळेगाव दशासर येथे अप.क्र. १४०/२०२६ कलम ३१८(४), ३(५) बियाणे नियम १९६८ चे कलम ७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५ बियाणे (नियंत्रण) आदेश १९८३ चे कलम ३,९ बीज अधिनियम ६ (ए), ६ (बी), ७(ए), ७ (बी) पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ७,८,१५(१), १५(२) तसेच अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७,९ नुसार गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

अमरावती जिल्हयातील कोणत्याही शेतक-याची अशी फसवणूक होवून आर्थिक नुकसान होवू नये याकरीता पोलीस अधीक्षकनिकेतन कदम यांच्या आदेशान्वये ठाणेदार पो.स्टे. तळेगाव दशासर यांनी तात्काळ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांच्याशी संपर्क साधुन अपर पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण श्री. दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी चांदूर रेल्वे . अशोक थोरात, तंत्र अधिकारी . नितीन लोखंडे यांच्या मार्गदर्शनात श्री. प्रविण खर्चे जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख व त्यांचे पथक तसेच ठाणेदार पो.स्टे. तळेगाव दशासर स.पो.नि. किरण औटे व त्यांच्या पथकाने सदरची कारवाई केली.

## आज जागतिक बाल कामगार प्रथाविरोधी दिन

प्रतिनिधी १२जून

**अमरावती:** बालमजुरी या अनिष्ठ प्रथेविरूद्ध विस्तृत प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. ही समस्या ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांशी निगडीत असल्यामुळे नागरिकांमध्ये सजगता आणण्यासाठी १२ जुन रोजी जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिवस साजरा करण्यात येतो. जिल्ह्यात सन २०२१ ते सन २०२६ पर्यंत ५८ धाडसत्राचे करण्यात आले. यात १८१ आस्थापनांना भेटी देऊन २५ बालक, बालकामगार मुक्त केले आहेत. यामध्ये १४ वर्षाचे आतील १० बालकामगार आहे. तसेच १४ वर्षावरील १५ बालक आहे. बालकामगार कामावर ठेवलेल्या ८ मालकावर बालकामगार अधिनियम, १९८६ अंतर्गत न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. मुक्त केलेल्या बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनाकरीता शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद व महापालिका यांच्यामार्फत १४ वर्षाखालील बालकामगाराचे पुनर्वसन करण्यात येते. बालकामगार या अनिष्ठ प्रथेतून राज्य मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या कृतीदलाची बैठक घेण्यात येते. तसेच केंद्र शासनाच्या बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ नुसार १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय, प्रक्रियेत कामावर ठेवणे, तसेच १४ वर्ष पुर्ण परंतू १८ वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने, नियोत्त्याने बाल अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवल्यास ६ महिने ते २ वर्षापर्यंत कारावास किंवा २० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते.

## सृजन मराठी साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्यची विभागीय समन्वयकांची घोषणा

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती:** मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या सृजन मराठी साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य या राज्यव्यापी साहित्यिक चळवळीने महाराष्ट्रातील विविध विभागांसाठी विभागीय समन्वयकांची नियुक्ती जाहीर केली आहे. साहित्यिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि राज्यभरातील साहित्यप्रेमींना एकत्रित जोडणे हा या नियुक्त्यांचा मुख्य उद्देश आहे.

परिषदेच्या राज्यस्तरीय समन्वय फोरममध्ये पुढील मान्यवरांची निवड करण्यात आली आहे : कोकण विभाग समन्वयक : प्रा. डॉ.शुभम पाटील (पालघर संपर्क : ८३५६०८६४३७ कार्यकक्षा : मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुग. 'पुणे विभाग समन्वयक अनघा नंदाने कोल्हापुर संपक.८६००२८८१६९, (कार्यकक्षा-पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर.) नाशिक विभाग समन्वयक : श्री. बाळासाहेब देशमुख (अहिल्यानगर) संपर्क : ९४२३७८२१०० कार्यकक्षा : नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार व अहिल्यानगर. अतिरिक्त प्रभार : छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली. अमरावती विभाग समन्वयक : श्री. प्रफुल्ल मंदा श्रीधर कुकडे (अमरावती संपर्क : ९७६३३८५४२८

(कार्यकक्षा : अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम व



यवतमाळ. नागपूर विभाग समन्वयक : अँड. भूपेश पाटील (नागपूर) संपर्क : ९८५०३३८०२१ कार्यकक्षा : नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली. सृजन मराठी साहित्य परिषद राज्यभर साहित्य, संस्कृती आणि सृजनशीलतेची व्यापक चळवळ उभी करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. नव्या समन्वयकांच्या नेतृत्वाखाली विविध साहित्यिक उपक्रम, कवी संमेलने, कथाकथन, चर्चासत्रे, वाचन चळवळ आणि सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहेत. राज्यातील सर्व साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, वाचक आणि मराठी भाषा प्रेमींनी या साहित्यिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

## जागतिक नेत्रदान दिन साजरा

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती:** येथे बुधवारी जागतिक नेतृत्व दिन साजरा करण्यात आला तसेच या ठिकाणी नेत्रदान प्रतिज्ञा-संदेश जनजागृती पदयात्रा नेहरू मैदान, अमरावती येथून काढण्यात आली होती.

नेत्रदाते, अवयवदाते आणि देहदात्यांच्या कुटुंबांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सायंकाळी राजकमल चौकात कार्यक्रम पार पडला.

पदयात्रेदरम्यान जनजागृती मोहिमेचे साहित्य देण्यात आले.

मी स्वतः माझे दयाळू डोळे दान करून मानवतेचा आदर वाढवीन! अवयवदान! देहदान! असा संदेश एवढे देण्यात आला.

हरिणा फाउंडेशन, अमरावती जागतिक नेत्रदान दिन आयोजन



समिती २०२६-२७ यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

हरिना नेत्रदान समिती कै. मधुसूदनजी जाजोदिया नेत्र प्रत्यारोपण केंद्र, कै. मंगलजीभाई पोपट नेत्र रुग्णालय हरिणा अवयवदान समिती हरिणा देहदान समिती यामध्ये सहभागी झाले होते.

आराधनाचे संचालक पुरण सेठ हबलानी, आमदार रवी राणा . स्वीकृत नगरसेवक संजय हिंगासपुरे. सुधा तिवारी. यश खोडके. भारती मोहकार. सतलाम कौर हुडा. आंब्यासीडर भारत गणेशपुरे, महापौर श्रीचंद तेजवानी. नगरसेवक विलास इंगोले, माजी खासदार अनंतराव गुढे. माजी मंत्री यशोमती ठाकूर. ताई समिती सभापती अविनाश मार्डीकर. आशिष अतकरे.: या व्यतिरिक्त हरिना नेत्रदान समितीचे सर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला वेग...

**वाशीम :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला युद्धपातळीवर प्रारंभ केला आहे. पशुधनाचे आरोग्य अबाधित राखणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून विभागाने राज्यभर व्यापक नियोजन केले असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली. घटसर्प (हेमोरेजिक सेप्टिसेमिया) व फऱ्या (ब्लॅक क्वार्टर) यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पावसाळ्यापूर्वी लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. लसींची गुणवत्ता आणि प्रभाव कायम राहावा यासाठी राज्यस्तरापासून ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत शीतसाखळी व्यवस्थापनाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. लस वाहतुकीसाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात असून आवश्यक तापमान राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

### रोजगार हमी, अर्धे तुम्ही अर्धे आम्ही, नव्हे 'पुर्णच आम्ही'....

# भ्रष्टाचाराची चतु:सुत्री, रोजगार हमी कागदोपत्री !

*** कागदोपत्री झाले नाले सरळ * जुन्याच विहिरी दाखवून काढले पैसे * मजुराच्या नावे बँकेत बोगस खाते * अल्पवयीन मुलाना दाखविले मजुर**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात रोजगार हमी योजनेत अर्धे आम्ही अर्धे तुम्ही नव्हे तर पुर्णच आम्ही असा प्रकार घडला. अनेक नाला सरळीकरणाचे कामे कागदोपत्रीच झाले. तर जुन्या विहिरींना दाखवून पैसे काढल्याच्या तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी सुरू असून काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मालेगाव तालुक्यातील रोजगार हमी योजनेत १०० कोटीचा भ्रष्टाचार झाला .यामध्ये अधिकारी , कर्मचारी , रोजगार सेवकांसह ६२ जणांवर गुन्हे दाखल झाले. नंतर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. याच्याअनेक तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त आहेत. अद्याप मात्र कोणतीही कारवाई न झाल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## सिंचन 'विहिरीं'चा लेखाजोखाच गायब !

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिर बांधकामासाठी अनुदान दिल्यानंतर सदर विहीर व नाला सरळीकरण अस्तित्वात आहे की नाही यासह अन्य बाबींचा अद्ययावत लेखाजोखाच रोजगार हमी योजना विभागाकडे नसल्याची बाब समोर आली आहे. शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विविध योजनेंतर्गत सिंचन विहीर व नाला सरळीकरण केल्या जाते. यासंदर्भातील अद्ययावत लेखाजोखा असणे अपेक्षीत आहे. गत काही वर्षापासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या सिंचन विहिरींपैकी किती विहिरींना पाणी लागले व किती विहिरींवर विद्युत पंप बसविण्यात आले, विहीर अस्तित्वात आहे की नाही याची अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी योजना विभागाकडे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध नसल्यानेदेखील माहिती संकलित करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले जाते.





जिल्ह्यातील १० वर्षात २०० कोटी पेक्षा अधिक रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार झाला आहे. रोजगार हमी योजनेचे विहिर, शेततळे, वृक्षारोपण, नालाखोलीकरण सर्व कामे कागदोपत्री दाखवून मजुराच्या नावे लाखो रूपयाचे बिल काढल्याचे मालेगाव तालुक्यातील वाघळूद ते बोरगाव येथे उघडकिस आले आहे. या व्यतिरीक्त जिल्ह्यात इतरही ग्रामपंचायतीमध्ये करोडोचा भ्रष्टाचार होवूनही अधिकाऱ्याच्या संगणमताने प्रकरण रफातफा करण्याची तयारी सुरू आहे. तालुक्यातील सर्वच गावात गेल्या १० वर्षात गावांतर्गत खडीकरण,पांदण रस्ते,वृक्षलागवड नाममात्र करून मोठया प्रमाणात रक्कमा उकळल्याचा संशय असून मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची माहिती समोर येत असून दबक्या आवाजात पंचायत समितीच्या आवारात याची मोठी खमंग चर्चा होत आहे, कामे न करताच मी बिले कशी काढली याची चढाओढ स्वयंघोषित कंत्राटदार यांच्यात लागली असून धाब्यावर हसून चर्चा होताना दिसत आहे.मनरेगा अंतर्गत गावात कामे करून गावातील रोजगार सेवकाला हाताशी धरून न झालेल्या कामाची तसेच नाममात्र केल्याची कामाची बिले काढल्याची माहिती मिळाली आहे. यापूर्वी सुद्धा काही गावातील नागरिकांनी तक्रारी करून गावातील जेष्ठ नागरिक, लहान मुले, १० एकर शेती असलेले शेतकरी व मृत्यू झालेल्या लोकांच्या नावाने बिले काढल्याची खात्रीशीर माहिती आहे.तसेच जे मजूर दाखविले आहेत त्यांना माहितीच नाही की आपण कोणत्या कामावर काम करत आहोत.त्याचे एटीएम स्वयंघोषित कंत्राटदार यांनी अगोदरच जवळ घेऊन ठेवले होते किंवा काही मिनी एटीएम ज्यांच्याजवळ आहेत. त्या लोकांना गावात आणून त्याचे अंगठे घेऊन मोठया प्रमाणात रक्कमा काढण्यात आल्या आहेत.याची चौकशी करण्याची गरज असून मोठया प्रमाणात भ्रष्टाचाराचा 'धूर' बाहेर येत असून मालेगांव तालुक्याची मनरेगा तील भ्रष्टाचाराच्या कामाची पुनरावृत्ती होते की काय? अशी शंका येत आहे. वाशीम जिल्ह्यासह रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार झाल्याच्या अनेक तक्रारी झाल्या मालेगाव तालुक्यात ८४ गावात चौकशी होवून अनेक अधिकाऱ्यांसह पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल झाले. अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झाला असून अनेक रोजगार अल्पवयीन मृत पावलेले आहेत. अनेकांच्या नावे शेतजमिनी असूनही त्यांना रोजगार दाखविण्यात आले आहे. या प्रकरणात वरिष्ठांपासून तर रोजगार सेवकापर्यंत सर्वच जण गुंतले आहेत. जिल्ह्यात अधिकारी व पदाधिकारी योजना राबविण्याऐवजी त्या कशा खातायेतील याकडे लक्ष देतात.

## 'सिटी न्युज सुपरफास्ट'चा वृत्त मालिकेतून पाठपुरावा

मालेगाव तालुक्यात रोजगार हमी योजनेत १०० कोटी रूपयाच्या वर भ्रष्टाचार झाल्याच्या ८९ वृत्ताची वृत्त मालिका सिटी न्युज सुपरफास्टने २ ते ३ वर्षात लावून धरली. त्यामुळे अधिकाऱ्यांना वारंवार कारवाईसाठी भाग पाडले. मालेगाव सह जिल्ह्यातही रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार झाला असून या संबंधिचीही वृत्त मालिका सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली. सुरूवातीला वाघळुद येथून सुरू झालेले भ्रष्टाचाराचे प्रकरण पुर्ण मालेगाव तालुक्यात वेढल्या गेल्याचे वृत्त मालिकेतून सिटी न्युज सुपरफास्टने प्रकाशित केले. व प्रशासनाचे लक्ष वेधले.


५ रविवार ७ ऑगस्ट २०२२ सिटी न्यूज सुपरफास्ट
मालेगाव तालुक्यातील मनरेगाचे १०० कोटीचे अपहार प्रकरण...
दुसरा मास्टरमाईंड गटविकास अधिकारी
संजय महागावकरला अटक !
* सर्वोच्च न्यायालयाने नाकारला होता जामीन * दोन वर्षापासून पोलीसांना देत होता गुंगारा
'सिटी न्युज सुपरफास्ट'चा वृत्त मालिकेतून पाठपुरावा


५ सोमवार दि.४ जुलै २०२२ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
मास्टर माईंड संदीप कोटकरचे..
जिल्हाभरात जाळे !
*मनरेगाच्या शंभर कोटीचे अपहार प्रकरण * मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता *५ जून पर्यंत पोलीस कोठडी


मनरेगातील कोट्यवधीच्या अपहारात चौकशी अधिकाऱ्याचे 'हात काळे'!
१२ महिन्यानंतर फक्त २ आरोपींना अटक!
मनरेगात शंभर कोटीचा अपहार; आरोपींचा मुक्तसंचार!
मालेगाव तालुक्यातील ८४ ग्रा.पं.ची चौकशी 'मॅनेज'!
तक्रारकर्ता गोपीनाथ नागरेचे कुटुंब दहशतीखाली!
जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे नाचताहेत कागदी घोडे !
मनरेगाच्या शंभर कोटीचे अपहार प्रकरण विधानसभेत !
मग्रारोहयोत शंभर कोटीचा अपहार!
मनरेगच्या शंभर कोटीचे अपहार प्रकरण...
दोन अटकेत; तिन दिवसाची पोलीस कोठडी
'त्या' तीन गटविकास अधिकाऱ्यांचा उच्च न्यायालयाने जामीन नाकारला !
मुख्य आरोपी ग्रामसेवक संतोष खुळेंच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या !
रोजगार हमीत भ्रष्टाचार, अधिकारी लाचार !
अटक न करण्याचा 'करार', दोन वर्षानंतरही आरोपी 'फरार'
भ्रष्टाचाराची चतु:सुत्री, रोजगार हमी कागदोपत्री !
सिंचन 'विहिरीं'चा लेखाजोखाच गायब !
मालेगाव तालुक्यातील मनरेगाचे १०० कोटीचे अपहार प्रकरण...
...अखेर मास्टर माईंड गटविकास अधिकारी संदीप कोटकरच्या आवळल्या मुसक्या !

## थोडक्यात

### जिल्ह्यात १६ ते २७ जूनपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मोहरम उत्सव तसेच विविध संघटनांच्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष योगेश कुंभेजकर यांनी संपूर्ण वाशिम जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७(१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

जिल्ह्यात १७ जूनपासून मोहरम उत्सवाला प्रारंभ होणार असून २६ व २७ जून रोजी मोहरम सवारी, ताजिये आदींच्या मिरवणुका व विसर्जन कार्यक्रम पार पडणार आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक, वाशिम यांनी केलेल्या शिफारशीनुसार हा आदेश जारी करण्यात आला आहे.या आदेशानुसार १६ जून २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून ते २७ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विविध प्रतिबंध लागू राहतील.

### प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'

## मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ



अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

### स्वाभिमानीच्या मागणीला यश...

## डीएपी खताचा संरक्षित साठा शेतकऱ्यांसाठी खुला !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून डीएपी खताचा संरक्षित साठा खुला करण्याची मागणी कृषी विभागाला केल्यानंतर प्रशासनाने त्यावर तात्काळ कारवाई करत ६५० मॅट्रिक टन डीएपी खत जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

जिल्ह्यात सध्या डीएपी खताचा तुटवडा निर्माण झाला असून शेतकऱ्यांची वाढती मागणी लक्षात घेता डीएपी खताचा संरक्षित साठा शेतकऱ्यांसाठी खुला करावा अशी



मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामू अण्णा इंगोले यांनी काल जिल्हा कृषी विकास अधिकारी अभिजीत देवगिरीकर यांना पत्र देऊन केली होती. त्यानंतर हा साठा खुला करून देत असल्याचे पत्र जिल्हा प्रशासनाकडून जारी करण्यात आला असून जिल्ह्यातील ४३ कृषी सेवा केंद्रावरून या खताची आजपासून विक्री होणार आहे. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या मागणीला यश आले असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



खरीप हंगाम अगदी तोंडावर आलेला असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात डीएपी खताची मागणी होत आहे. मात्र शेतकऱ्यांना हवे असलेले खत बाजारात उपलब्ध नाही तर दुसरीकडे जिल्हा प्रशासनाने ६०० मॅट्रिक टन डीएपी खताचा साठा संरक्षित करून ठेवला होता. हा साठा शेतकऱ्यांना त्वरित खुला करावा अन्यथा गोडावून फोडून शेतकऱ्यांना खत उपलब्ध करून देऊ असा इशारा दामु अण्णा इंगोले यांनी कृषी विभागाला दिला होता.

## पोस्टमन ते PSI जिद्द, मेहनत आणि संघर्ष !

### गोपाल देशमुख यांची प्रेरणादायी यशोगाथा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वयाच्या ३३ व्या वर्षी मिळवले पोलीस उपनिरीक्षक पद; गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यशाचे शिखर गाठणारे वाशिम तालुक्यातील तांदळी बुद्रुक गावचे सुपुत्र गोपाल देशमुख यांची श्ड्ढए मार्फत पोलीस उपनिरीक्षक (इएट) पदावर निवड झाली. सामान्य कुटुंबातून आलेल्या गोपाल यांच्या संघर्षमय प्रवासाने गावातील युवकांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

गोपाल देशमुख यांच्या वाट्यावर बालपणापासून आलेला संघर्ष आई-वडिलांनी केलेले कष्ट, दिलेले संस्कार आणि त्यांच्या स्वप्नांना दिलेला पाठिंबा यामुळे गोपाल यांनी आयुष्यात काहीतरी मोठे करण्याचे ध्येय मनाशी बाळगले. शेतकरी कुटुंबातील परिस्थिती आणि अनेक अडचणी असूनही त्यांनी आपल्या ध्येयाचा पाठलाग करणे कधी सोडले नाही.



सन २०११ मध्ये त्यांना पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी मिळाली. मात्र मनात असलेले पोलीस अधिकारी बनण्याचे स्वप्न त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. स्थिर नोकरी असूनही त्यांनी धाडसी निर्णय घेत पोस्टातील नोकरीचा राजीनामा देऊन स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. समाजातीचे बोलणे, घरची परिस्थिती आणि अनेक आव्हाने यांचा सामना करत त्यांनी संघर्षाची वाट निवडली. २०१४ मध्ये त्यांची एइ मध्ये निवड झाली. मात्र पोलीस दलात जाण्याचे ध्येय कायम राहिले. त्याच काळात पोलीस भरतीची सुवर्णसंधी मिळाली आणि वाशिम पोलीस भरतीत त्यांची निवड झाली. यानंतरही मोठ्या पदाचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवून त्यांनी अभ्यास सुरूच ठेवला. २०२२ मध्ये श्ड्ढए मार्फत विभागीय इएट भरतीची संधी मिळाल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने तयारीला सुरुवात केली. पहिल्या प्रयत्नात यश थोडक्यात हुकले, पण अपयशाला न घाबरता त्यांनी पुन्हा मेहनत सुरू ठेवली व पूर्व तसेच मुख्य परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाले. त्यानंतर नोकरीची जबाबदारी, संसार, अभ्यास, पायाची दुखापत आणि लांबलेली शारीरिक चाचणी अशा अनेक अडचणींवर मात करत त्यांनी शेवटी आपले ध्येय गाठले. या संपूर्ण प्रवासात त्यांच्या पत्नीने दिलेली साथ आणि प्रोत्साहनही महत्त्वाचे ठरले. कुटुंबाचा भक्कम आधार आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती यामुळे त्यांनी हे यश संपादन केले. एप्रिल २०२६ मध्ये मुंबई येथे झालेल्या इएट निवड प्रक्रियेतील अंतिम टप्पा म्हणजे ग्राउंड टेस्टमध्ये त्यांनी उत्कृष्ट गुण मिळवले. दोन वर्षांच्या अथक परिश्रमाचे अखेर यशात रूपांतर झाले 'आपले ध्येय साध्य करताना त्याच्याशी कधीही तडजोड करू नका. अपयशाला घाबरू नका, पुन्हा नव्या जोमाने तयारीला लागा. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अभ्यासामध्ये सातत्य ठेवाष्ठ एक दिवस यश नक्कीच मिळते.'

## शेतकरी - ग्रामस्थांना पावसाची प्रतीक्षा !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

'रोहिणी मृगाच्या बहिणी' रोहिणी चांगल्या बरसल्या म्हणजे पावसाळा चांगला होतो. ही म्हण ग्रामस्थ सांगतात. यंदा विदर्भात रोहिणी नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले. मृग नक्षत्र लागून तीन-चार दिवस उलटले तरी आकाशात ढगाचा एकही तुकडा नाही. विदर्भासह अकोला-वाशिम जिल्हा आजही ४२ ते ४४ अंशाच्या प्रखर उष्णतेने आणि जीवघेण्या उकाड्याने होरपळून निघत आहे. शेतकरी, ग्रामस्थ, जनावरे आणि सर्वसामान्य जनता चातक पक्षाप्रमाणे आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत आहे.

ज्येष्ठांच्या सांगण्यानुसार मृग नक्षत्र ७ जूनला लागते. एखादा दिवस मागे पुढे होत असल्याने यंदा ८ जूनला लागले. 'मृग पडला की पाऊस पडला. आणि मृगा मध्ये पेरण्या झाल्या की पिकमान चांगले होते' असा जुन्या जाणत्या शेतकऱ्यांचा अनुभव आहे. पण यंदा मृगाचे चार दिवस उलटले तरी जमीन तापलेलीच आहे. शेतशिवारात भेगा पडल्या आहेत. पेरणीची तयारी करून बसलेला बळीराजा हताश झाला आहे. बियाणे, खते घेऊन ठेवली, नांगरट करून शेत तयार आहे. पण पाऊस नसल्याने पेरणी खोळंबली. 'मृगाचा पाऊस भरपूर झाला. मायमाऊली काळ्या आईची तहाण भागली की लवकर पेरणी करता येईल. व उत्पादन चांगले होईल आणि उशीर झाला तर उत्पादन घटणार,' अशी दुहेरी चिंता शेतकऱ्यांना सतावते आहे. गावखेड्यातील परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. विहिरी, बोअरवेलनी तळ गाठला आहे. नदी-नाले कोरडेठाक पडलेत. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना दूरवर पायपीट करावी लागत आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. हिरवा चारा संपला, ज्वारीचा पेरा घटल्याने कडब्याची कमतरता असून कुटाराची साठवण कमी पडते आहे. उन्हाच्या तडाख्याने माणसांसह पशुपक्षीही व्याकुळ झाले



आहेत. दुपारी १२ ते ४ घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. उष्माघाताचे रुग्ण वाढत आहेत. हवामान खात्याने यंदा अल निनो सक्रिय असल्याने पाऊस सरासरीपेक्षा कमी राहील, असा अंदाज आधीच दिला होता. मृग नक्षत्रात पाऊस न आल्याने तो अंदाज खरा ठरतो की काय, अशी भीती व्यक्त होत आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरात अजून कमी दाबाचे क्षेत्र तयार झालेले नाही. त्यामुळे मान्सूनचा प्रवास रखडला आहे. विदर्भात पुढील चार-पाच दिवस तरी मोठ्या पावसाची शक्यता नाही. तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण राहील, पण पेरणीयोग्य पाऊस होणार नाही. आमच्या लहानपणी मृग लागला की शेतात चिखल व्हायचा. आता निसर्गचक्र बदलले. रोहिणी, मृग कोरडे जातात. शेतकऱ्याने जगायचे कसे असा सवाल ७५ वर्षीय शेतकरी केशवराव राऊत पाटील यांनी केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. १२ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# सेवानिवृत्तांना १०, २०, ३० चा लाभ जिल्हा परिषद ने दिला

**मलकापुर:** बुलढाणा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग व पशुसंवर्धन विभागाने आपल्या विभागातील सेवानिवृत्त महिला कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याचे आदेश देण्यात आलेले आहेत आरोग्य विभागाने आठ आरोग्य सेविकांना दुसऱ्या लाभाचे आदेश पारित केले असून प्रा. आरोग्य केंद्राने त्यांना आर्थिक लाभ त्वरित द्यावा तिसरा लाभ विकून ३० महिला कर्मचाऱ्यांना देण्यात आला असून त्यांनी सुद्धा त्यांच्या अध्यक्ष/सचिव विकास खंड शाखा सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण समितीशी संपर्क साधून पुढील कार्यालयीन कारवाई करून घ्यावी त्यांना आदेशाच्या प्रति पुरविण्यात आलेले आहेत पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांनी मोताळा विकास खंडातील दोन सेवानिवृत्त पट्टी बंधकांना तिसरा लाभ जाहीर करण्यात आलेला आहे सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना हा लाभ मिळवून देण्याकरिता बुलढाणा जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण समितीने सतत प्रयत्न केलेले आहे अशी माहिती कल्याण समितीच्या वतीने अध्यक्ष प्रभाकरराव डुकरे, उपाध्यक्ष भाऊराव राऊत, कोषाध्यक्ष गणेशराव ठाकरे व सरचिटणीस रमेश होले यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली.

# शेगाव संत नगरी भाविकांनी हाऊसफुल्ल

## ◆ श्रीचे समाधी दर्शनाकरीता, ३.३० तास श्रीमुख दर्शनाकरीता ४५ मिनीटे ◆ शहरात भाविकांची मांदियाळी..

प्रतिनिधी १२ जून

**शेगांव :** विदर्भाच्या पंढरीत अधिक महिना, आज कमला एकादशी व गुरुवार असल्याने राज्यातील जवळपास एक लाख भाविकांनी श्रींचे समाधीचे दर्शन घेऊन, जवळपास ६५ हजार भाविकांनी श्रींच्या महाप्रसादाचा लाभ घेऊन धन्य झाले आहेत. शहरातील लहान मोठ्या व्यवसायिकांचे चांगलाच उलाढाल झाला आहे.

विदर्भाची पंढरी असलेल्या संत नगरी शेगाव येथे अधिक महिन्यात जवळपास दररोज ५० ते ६० हजार भाविक श्रींच्या मंदिरात दर्शनासाठी येत आहे तर सुट्टीच्या दिवशी शनिवार, रविवार, गुरुवार, एकादशी या दिवशी जवळपास ७० ते ८० हजारांहून अधिक भाविकांनी श्रींचे चरणी नतमस्तक झालेत.

हिंदू पंचांगानुसार दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक महिन्याला (पुरुषोत्तम मास) अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी मानले जाते हा महिना भगवान विष्णूच्या उपासनेसाठी समर्पित असून, या काळात केलेले दान, जप आणि व्रतवैकल्ये यांचे फळ अनेक पटींनी मिळते अशी धार्मिक श्रद्धा आहे. यामळे या महिन्यात भाविक राज्यातील विविध देवी, देवतांच्या दर्शनाला जात असतात.

विदर्भाची प्रति पंढरी व महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या संत नगरी शेगाव येथे श्री दर्शन करण्याच्या उद्देशाने श्री संत गजानन महाराज मंदिर मध्ये दर्शन घेण्यासाठी गर्दी करणे सुरू केल्याने विदर्भ मराठवाडा कोकण मुंबई पश्चिम महाराष्ट्र इत्यादी भागातील जवळपास एक लाखाहून अधिक भाविक संत नगरीत दाखल झाले होते. त्याचप्रमाणे श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अनेक भाविक भक्तांनी केले. श्रींच्या समाधी दर्शनासाठी सुमारे ३:३० तास, श्रीमुख दर्शनासाठी ४५ मिनिटे वेळ लागत आहे. श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेण्यासाठी भाविक दर्शन बारीत शिस्तबद्ध पद्धतीने रांगेत लागून श्रींचे मनोभावे दर्शन घेतले. श्रींच्या समाधी मूर्तीचे दर्शन घेऊन भाविकांनी श्री राम मंदिरात श्रीराम लक्ष्मण माता सीता व हनुमंताचे दर्शन घेतले. कमला



एकादशी व गुरुवार असल्याने जवळपास ६५ हजार भाविकांनी महाप्रसादाचा सुद्धा लाभ घेतला .श्री मंदिर परिसरात झालेल्या गर्दीमुळे कोणत्याही भाविकांना श्रींचे दर्शन घेण्यास असुविधा होऊ नये व त्यांना योग्य प्रकारे श्रींचे दर्शन घेता यावे याकरिता मंदिर परिसरात ठिकठिकाणी शेकडो सेवाधारी आपली सेवा दिली आहे .

भाविक भक्तांचे वाहनांसाठी श्री संस्थानचे नि:शुल्क वाहन पार्किंगचा लाभ भक्त घेत आहेत. तर शहरातील सर्व खाजगी वाहन पार्किंग सुद्धा हाऊस फुल्ल झाले आहे तर प्रमुख मार्गावर सुद्धा वाहणे उभे आहे. अधिक महिनाभर श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

**श्री संस्थान उत्कृष्ट नियोजन**

भाविकांनी शेगांव येथे केली मोठ्या प्रमाणात गर्दी !

अधिक महिन्यात दररोज हजारो भाविकांनी शिस्तबद्धरित्या घेतले श्रींचे समाधीचे दर्शन. !!

कमला एकादशी व गुरुवार श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना श्रींच्या समाधी दर्शन घेऊन बाहेर येणाऱ्या भाविकांना खोबऱ्याची बर्फी प्रसाद देण्यात आला आहे.

**श्री क्षेत्र नागझरी येथे भाविकांची गर्दी**

शेगांव पासुन ७ कि.मी अंतरावरील असलेल्या श्री संत गोमाजी महाराज संस्थान नागझरी येथे सुद्धा भाविकांनी श्री संत गोमाजी महाराज दर्शनासाठी गर्दी झाली आहे. या ठिकाणी श्री गोमाजी महाराज संस्थानच्या वतीने सकाळी ११ ते १२ या वेळेत हजारो भाविकांनी महाप्रसाद लाभ घेतला आहे.

**श्री गजानन महाराज संस्थान च्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल भाविकांकडून प्रशंसा..**

श्रींच्या दर्शना निमित्त शेगाव येथे आलेल्या हजारो भाविकांमुळे राज्य परिवहन महामंडळाला तसेच रेल्वे खाजगी वाहने सुद्धा मोठा आर्थिक फायदा झाला तर अनेक सुशिक्षित बेरोजगार व लहान व्यवसायिकांनी अधिक महिना पावल्याची भावना व्यक्त केली भाविकांनी गर्दी केल्यामुळे हार फुल विक्रेत्यांचा सोबतच चहा विक्रेते व नाश्ता, हाटेल, भोजनालय तसेच विविध खेळणे आणि वस्तू विक्रेते लहान व्यवसायिकाकडे खरेदीदार यांनी एकच गर्दी केल्याचे दिसत होते.

**श्री लहुजी वस्ताद चौकातील रस्ता मोकळा ठेवावा.**

श्री गजानन महाराज संस्थानच्या पार्किंग व्यवस्थेमध्ये आपली वाहने उभी करुन भाविक भक्त भक्तनिवास येथुन श्रींच्या मंदिराकडे जाण्यासाठी रस्ताने येतात तर श्री लहुजी वस्ताद चौकात लहान हातगाडीवर व्यवसायिकांनी आप आपल्या दुकाने लावलें असल्यानेच भाविकांना मंदिरात जाता येत नाही मंदिरात कुठून जावे असा प्रश्न भाविकांना पडतो तर या ठिकाणी मध्ये ऑटो व्यवसायकांनी आपले ऑटो मध्यें उभे केलेले असतात यामुळे श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना त्रास होत असल्याने भाविक भक्त नगरपरिषद व पोलीस प्रशासन बद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे तरी याकडे लक्ष देऊन श्री लहुजी वस्ताद चौक रिकामा ठेवावा असे भाविकांच्या वतीने मागणी करण्यात येत आहे.

# घरात घुसून महिलेच्या विनयभंगाचा प्रयत्न

## ◆ ७ जणांविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी १२ जून

**शेगाव:** शहरातील जय अंबे नगर परिसरात एका विवाहित महिलेच्या घरात घुसून विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तसेच मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध शेगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, ३ जून रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास ती आपल्या भावाच्या घरी झोपलेली असताना आरोपी विजय शिवशंकर वानखेडे याने अनधिकृतपणे घरात प्रवेश केला. त्याने पीडितेशी अश्लील वर्तन करत लज्जास्पद भाषेचा वापर करून विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पीडितेने आरडाओरड केल्याने तिचा भाऊ व आई घटनास्थळी धावून आले. त्यांना पाहून आरोपी तेथून पळून गेला.

त्यानंतर आरोपी विजय वानखेडे याने रस्त्यावर जाऊन आरडाओरड केल्याने इतर आरोपी घटनास्थळी आले. सर्वांनी संगनमत करून गैरकायदेशीर जमाव तयार केला आणि पीडिता व तिच्या भावाला चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच महिला आरोपींनी पीडितेस अश्लील शिवीगाळ केली. याशिवाय, पोलिसांत तक्रार दिल्यास हात-पाय तोडण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी विजय शिवशंकर वानखेडे, संतोष वानखेडे, विठ्ठल वानखेडे, स्वाती विजय वानखेडे तसेच अन्य ३ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (ॅन्ए) अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा क्रमांक ३६१/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

# मोहाडी नजीकच्या महामार्गाचे काम संथगतीने; प्रवाशांना उद्धवत आहे मणक्याचे आजार

प्रतिनिधी १२ जून

**खामगाव:** राष्ट्रीय महामार्ग क्र. १५७ च्या मोहाडी नजीक सुरू असलेल्या संथगतीच्या कामामुळे वाहन धारक शेतकरी आणि प्रवाशांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

सध्या या मार्गावर केवळ मातीचे थर पसरवून काम अत्यंत ढिसाळ पद्धतीने सुरू असल्याने संपूर्ण परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. आगामी पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण झाले नाही, तर या ठिकाणी मोठ्या अपघातांची मालिका सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच मार्गावर कृष्णप्रिय गोशाळा असून, तेथील गायींना या प्रचंड धुळीचा मोठा फटका बसत आहे. या संदर्भात गोशाळा चालक व संबंधित नागरिकांनी जिल्हाधिकारी महोदयांना २ ते ३ कवेळा लेखी निवेदन देऊन कारवाईची मागणी केली होती. परंतु, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

परिसरातील अंदाजे २ किलोमीटरच्या अंतरात हे काम सुरू आहे. या धुळीचा सर्वाधिक फटका स्थानिक शेतकऱ्यांना बसत आहे.



वैरागड गावचे पो. पाटील आणि डॉ रविकांत साठे यांच्या शेतातील कारले पिकावर या धुळीचे जाड थर साचल्याने उभे पीक उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. 'आमच्या या अतोनात नुकसानीची भरपाई कोण देणार?' असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत. या महामार्गाच्या कामाला सरुवातीलाच वनविभागाने विरोध केल्यामुळे तब्बल ३ महिने काम ठप्प होते. त्या काळातही सर्वसामान्य जनतेला अतोनात त्रास सहन करावा लागला होता. आता कुठे काम सुरूझालेतर संथगतीने सुरू आहे. वास्तविक पाहता, हा रस्ता आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षेचे होते. मात्र, कंत्राटदार आणि प्रशासनाच्या संथ कारभारामुळे जर याच गतीने काम सुरू राहिले, तर हा २ किलो मीटरचा रस्ता पूर्ण होण्यासाठी आणखी २ ते ३ वर्षे लागतील, अशी भीती व्यक्त होत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहनधारकांसह प्रवाशांनाही त्रासाचे होत आहे.

सध्याची भीषण परिस्थिती पाहता, जिल्हा प्रशासनाने आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी यात तातडीने लक्ष घालून रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा आणि तोपर्यंत धुळीचा त्रास कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांसह उदयनगर परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# पोटळी येथे बैलांच्या शिंगाच्या कर्करोगावर वनौषधीद्वारे उपचार

प्रतिनिधी १२ जून

**नांदुरा:** तालुक्यातील ग्राम पोटळी येथे बैलांच्या शिंगाला होणारा कर्करोग, स्थानिक भाषेत 'मगरी' म्हणून ओळखला जाणारा आजार, पशुवैद्यकीय शास्त्रात 'हॉर्न कॅन्सर' आजारावर वनौषधी ऊपचार केला जात आहे.

आधुनिक वैद्यकशास्त्रात वरील आजारावर शस्त्रक्रिया हा प्रमुख उपचार मानला जात असताना, बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील कुटे (पोटा) येथील एका शेतकरी कुटुंबाने वनौषधीच्या माध्यमातून उपचाराची पारंपरिक पद्धत तीन पिढ्यांपासून जपली आहे. पोटा येथील गणपत भगवान पाटील कुटे यांच्या कुटुंबाकडे या



आजारावरील उपचार अनेक वर्षांपासून केले जात आहेत. विशेष म्हणजे, या उपचारासाठी कोणतीही फी आकारली जात नाही. आजही जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून शेतकरी आपले बैल घेऊन येथे येत असल्याचे सांगितले जाते. उपचारासाठी बैलाला शनिवारी सकाळी सात वाजण्यापूर्वी आणावे लागते. जंगलातून आणलेल्या विशिष्ट वनौषधींची पेस्ट तयार करून ती संबंधित बैलाच्या आजारी शिंगाच्या बाजूच्या नाकपुडीतून दुधासह दिली जाते. एका बैलावर उपचार करण्यासाठी साधारण अर्धा तास लागतो. हा उपचार सलग तीन शनिवार करण्यात येतो.

उपचारासाठी बैल मालकाने फक्त १ लिटर दूध आणायचे असते. गणपत पाटील किंवा त्यांचे चिरंजीव स्वतः हा उपचार करतात. ते बाहेरगावी जात नसल्याने बैल मालकांना उपचारासाठी बैल कुटे यांचे घरी पोटा येथेच आणावा लागतो. गावातील ज्येष्ठांच्या मते, ही उपचार पद्धती अनेक वर्षांपासून सुरू असून शेकडो बैलांना याचा लाभ झाल्याचा दावा केला जातो. ग्रामीण भागातील पारंपरिक ज्ञान आणि वनौषधींचा वापर याचे हे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण मानले जाते.

'मगरी' हा बैलांमधील स्क्वॅमस सेल कार्सिनोमा प्रकारातील कर्करोग मानला जातो. आधुनिक पशुवैद्यकीय शास्त्रानुसार यावर खात्रीशीर औषध उपलब्ध नसून अनेक प्रकरणांमध्ये शिंग काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागते. पोटा येथे केला जाणारा उपचार हा पारंपरिक वनौषधी उपचार प्रकार आहे. पशुधनाच्या आरोग्यासाठी अशा उपचारांसोबत तज्ज्ञ पशुवैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

# बचतगटांना अर्थसहाय्य देऊन विकास कार्यक्रमांना गती द्या!

## ◆ जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग

प्रतिनिधी १२ जून

**बुलढाणा :** बचत गटांना अधिकाधिक अर्थसहाय्य उपलब्ध करून देत त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना द्यावी आणि विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बँकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग यांनी केले.

ते महिला आर्थिक विकास महामंडळ (मावीम), बुलढाणा यांच्या वतीने बचत गटातील महिलांसाठी आर्थिक सहाय्य नियोजन (क्रेडिट प्लॅन) कार्यशाळा २०२६-२७ बुधवारी हॉटेल बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी येथे पार पडली. त्यावेळी बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग होते. प्रमुख पाहुणे म्हणून मावीमचे विभागीय सल्लागार केशव पवार, पोखरा कार्यक्रमाच्या कृषी विभागाच्या नोडल अधिकारी पाटील तसेच जिल्हा समन्वय अधिकारी राजेश नागपुरे उपस्थित होते. कार्यशाळेत विविध बँकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये एसबीआयचे रविकिरण खेडेकर, युबीआयचे अनिल देशमुख, एमकेजीबीचे बाईनोड, सीबीआईचे तायडे, बैंक ऑफ इंडीयाचे प्रसाद देशमुख व अभिजित पंडित, एचडिएफसीचे महेश बरडे, आयसीआयसीआयचे अमित वडगावे यांच्यासह खादी ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र आणि विविध संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सीएमआरसी व्यवस्थापकांनीही सहभाग नोंदविला.

यावेळी विभागीय सल्लागार केशव पवार यांनी जिल्ह्यातील बचत गट योगदान महत्वपूर्ण असल्याचे सांगितले. जिल्हा समन्वय अधिकारी राजेश नागपुरे यांनी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय बचत गटांच्या कर्ज उद्दिष्टांची माहिती देत त्यासाठीची रणनीती उपस्थितांसमोर मांडली. कार्यक्रमात मुंबई येथून सचिन आहेर आणि विभागीय व्यवसाय सल्लागार पवन देशमुख यांनी आभासी माध्यमातून सहभाग घेतला. कार्यशाळेत मावीमच्या वतीने १ हजार ४०३ बचत गट आणि ५०० वैयक्तिक महिला कर्ज प्रकरणांसाठी एकूण ७५.६२ कोटी रुपयांच्या कर्ज नियोजनाला मंजुरी देण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन सहायक जिल्हा समन्वय अधिकारी समीर देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन सहायक सक्षमीकरण अधिकारी शरद शिरसाट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महेश पाटील, विजय कदम, राजेश शेगोकार, येंडोले आणि विशाल पवार यांनी सहकार्य केले.

# टँकरपासून खामगाव ग्रामीण भाग मुक्त
## तालुक्यातील ११ गावांची तहान अधिग्रहीत विहिरींवर

प्रतिनिधी १२ जून

**खामगाव:** उन्हाळा अंतिम टप्प्यात असतांना देखील तालुक्यातील तब्बल ११ गावांची तहाण अधिग्रहीत विहिरींवर आहे. याच विहिरींच्या माध्यमातून गावात पाणी पुरवठा केल्या जात आहे. तर दुसरीकडे मात्र यंदा ग्रामीण भाग पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरपासून मुक्त झाला आहे.

उन्हाळ्याच्या दिवसात ग्रामीण भागासह शहरातही पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. त्या अनुषंगानेच प्रशासनाच्या माध्यमातून पाणी टंचाई निवारणार्थ कृती आराखडा करावा लागतो. यासाठी महसुल व पं. स. च्या माध्यमातून हे नियोजन केल्या जाते. यंदा खामगाव तालुक्यातील एकाही गावात टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली नसली तरी १० गावांसाठी मात्र अधिग्रहीत



विहिरी कराव्या लागल्या आहेत. अशा गावांमध्ये जयपूरलांडे, खामगाव ग्रामीण, मात्का कोक्ता, कोलोरी, गवंडाळा, जळकाभंडग, नायदेवी, पिंप्री देशमुख, कारेगावबु., लांजुळ व पिंप्री गवळी या गावांचा समावेश आहे. तर सुजातपूर अंतर्गत आमसरी तसेच पारखेड आणि किन्ही महादेव या गावांसाठी अधिग्रहीत विहीरी करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित आहे. तशी माहिती तहसील कार्यालय व ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग खामगाव यांच्याकडे सादर करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात जर पावसाला विलंब झाला तर उपरोक्त तीनही गावांसाठी विहिरी अधिग्रहीत कराव्या लागणार आहे.

# शासनाचे आदेश न पाळणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई करा अन्यथा त्या शाळांना कुलूप ठोकू - कैलास फाटे

## 'शासनाचे २२ जून व कोर्टाचे ३० जून चे आदेश असतांना १५ जून चा मुहूर्त शाळांनी कोणत्या उद्देशाने काढला' पालक वर्गात संताप

प्रतिनिधी १२ जून

**खामगाव :** विदर्भात सूर्य आग ओकत असतांना महाराष्ट्रातील शिक्षण मंत्रालयाने २२ जून व हायकोर्टाने ३० जून चे आदेश काढले असतांना शिक्षण संस्था चालक मात्र हट्टी व बिनडोक पानाचा आव आणत विध्यार्थ्यांना मात्र आगीच्या खाईत टाकण्याचा प्रयत्न करत आहे. वर्षानुवर्ष निसर्ग आपले रूप बदलत आहे त्यामुळे पारंपरिक अनेक कार्यांमध्ये जनतेनेच नव्हे तर शासनानेसुद्धा बदल केलेले आहे. परंतू आज मनुष्यालाच असह्य होणारे तापमान छोट्या विध्यार्थ्यांना कसे सहन होणार, आपल्या पोटच्या गोळ्याला जन्मापासून जोपासत आलेले मातापिता आपल्या मुलांना आगीच्या खाईत कसे पाठवणार हे संस्था चालकांना व प्रशासनाला समजत नसावे एवढे नादान ते नाहीत. आजपर्यंत जनतेच्या खजानातला पैसा लुटारूंच्या घशात ओतला परंतु शासकीय शाळांमध्ये अश्या तापमानाच्या वेळी विध्यार्थ्यांचा बचाव करण्यासाठी साधे फॅन सुद्धा शाळांमध्ये बसवलेले नाहीत तर कोणत्या भरवश्यावर हे नाकर्ते त्या मातापित्यांच्या लाडल्यांना सुरक्षित ठेवणार.

ज्या अर्थी कथित कोरोनाच्या काळात विध्यार्थ्यांना घरून ऑनलाईन शिक्षण दिले, त्या वेळी सुचलेले शहाणपण अश्या सत्य अग्नितांडवाच्या काळात ह्या नाकर्त्यांना समजू नये ? आज मुलांच्या आरोग्याला काही झाले तर त्या मातापित्यांची भरपाई कोणत्या स्वरूपात हे शिक्षण सम्राट करून देणार ह्याची सुद्धा घोषणा त्यांनी करावी आणि आमदार, खासदार, मंत्री व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी आपले मुलांना सुद्धा सूर्य आग ओकने थंबवत नाही तोपर्यंत आपली मुले सुद्धा त्या असुविधा असलेल्या शाळेत पाठवावे असे आव्हान कॉंग्रेस पक्षाचे ओबीसी विभागाचे अमरावती विभाग प्रभारी समन्वयक व शेतकरी नेते कैलास फाटे यांनी केले. १५ जून शाळेच्या सुरवातीचा निर्णय संस्था चालकांनी बदलून शासनाने व हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाचे पालन करावे नाहीतर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला बाधा झाली तर आम्हाला शाळेला ताला ठोक आंदोलने करावे लागतील त्याची जवाबदारी शासन, प्रशासन व संस्था चालकांची राहील असा इशारा कैलास फाटे यांनी दिला.

# आजाराला कंटाळून युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी १२ जून

**खामगाव:** तालुक्यातील पिंप्री देशमुख येथील १९ वर्षीय युवकाने मिरगीच्या आजाराला कंटाळून शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक उर्फ यश सुरेश कराळे वय १९ असे मृत युवकाचे नाव आहे. याबाबत सागर एकनाथ कराळे वय ३२ रा. घाटपुरी यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात माहिती दिली. मृतक प्रतीक याला २०१४ पासून आजाराचा त्रास होता. त्याच्यावर अकोला येथील डॉक्टरांकडे उपचार सुरू होते. दरम्यान, दीर्घकाळ आजाराने त्रस्त झाल्यामुळे त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ९ जून रोजी सकाळी ११ वाजतापासून १० जून रोजी सकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान पिंप्री देशमुख शिवारातील पवन गरड यांच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन त्याने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याला विहिरीतून बाहेर काढून खामगाव येथील रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस कर्मचारी किरण राऊत करीत आहेत.

# हमाल-माथाडी कामगारांना अंत्योदय योजनेचा लाभ!

## ◆ प्रशासनाच्या हालचाली; इष्टांक वाढीची माहिती!

प्रतिनिधी १२ जून

**मलकापूर:** बाजार समितीच्या अखत्यारीतील शेकडो हमाल-माथाडी कामगारांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. या अनुषंगाने लाभार्थी इष्टांकात वाढ करण्यात आल्याची माहिती आहे.

मलकापूर बाजार समितींतर्गत कार्यरत असलेल्या अनेक हमाल-माथाडी कामगारांना अद्याप अंत्योदय योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब समोर आली. होती. यासंदर्भात राज्य शासनाने २०१३ मध्ये अध्यादेश जारी केला असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रसाद जाधव यांनी ९ एप्रिल रोजी पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याकडे हा विषय मांडला होता, तसेच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडेही राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडून पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर १ मे २०२५ रोजी शासन स्तरावरून या प्रकरणात तत्काळ आणि योग्य कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.

**कागदपत्रे व माहिती सादर करण्याच्या सूचना**

१५ मे २०२५ रोजी मलकापूर तहसीलदारांनी स्थानिक बाजार समितीला हमाल-माथाडी कामगारांची आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करण्याबाबत तातडीच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर इष्टांक वाढीची प्रक्रिया सुरु झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे संबंधित कामगारांना अंत्योदय योजनेचा लाभमिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. १२ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# तुकाराम मुंढेंच्या कारवाईने नकली दूध, पनीर, व खवा विक्रीत घट

## ♦ कारवाईमुळे वाढले पनीर व खव्याचे दर



प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार तुकाराम मुंढे यांनी स्वीकारल्यानंतर दुधाचे संकलन कमी झाले आहे. त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसला असून खवा व पनीरच्या दरामध्ये किलोमागे ८० ते १०० रुपये दरवाढ नोंदवली गेली आहे.

हॉटेल व्यावसायिकांना सध्या पनीरची कमतरता जाणवते आहे. येत्या काळात दर आणखी भडकण्याची शक्यता आहे. राज्यभरात मुंढे यांच्या कारवायांमुळे खळबळ उडाली आहे. अकोला जिल्ह्यात दुधाचे संकलनामध्ये मोठी घट झाल्याचे चित्र आहे. दूध संकलनामुळे आपोआपच दुग्धजन्य पदार्थांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. विशेषतः खवा आणि पनीरसाठी आता आगाऊ मागणी नोंदवावी लागत आहे.

सध्या लग्नसराई नसल्याने बाजारामध्ये खवा आणि पनीरला सामान्य मागणी आहे. खव्याचे दर पूर्वी २४० ते २६० रुपये किलोदरम्यान होते. ते दर आता ३०० रुपये किलोवर गेले आहेत.अकोला जिल्ह्यात नांदुरा येथून खवा मोठ्या प्रमाणावर येतो. रंगाने तांबूस असलेला हा चविष्ट खवा लग्न व इतर समारंभांमध्ये हमखास वापरला जातो. दुसरीकडे गायीच्या दुधामध्ये मक्याच्या पिठाचे मिश्रण करून त्यापासून खवा तयार केला जातो. मात्र, तो रंगाने पांढरा असतो.

### पनीरच्या भावात वाढ

दुसरीकडे पनीरचे बाजारातील दर ४०० ते ४२० रुपये किलो झाल्याची माहिती दुकानदारांनी दिली. किरकोळ विक्रीसाठी पनीरचे दर ४४० रुपयांवर पोहोचले आहेत. तर सोयाबीन पासून बनणारे पनीर अर्थात टोफू २६० ते २८० रुपये किलो प्रमाणे मिळत आहे. तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त दुधावर कारवाईचा बडगा उगारताच अनेक खासगी व्यावसायिकांनी पनीर उत्पादन थांबवले आहे. मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाची धुरा हाती घेण्यापूर्वी पनीरचे दर ३५० ते ३७० रुपये किलोपर्यंत होते.

### ६ लिटर दुधातून १ किलो खवा

एक किलो खवा बनवण्यासाठी पाच ते सहा लिटर दूध लागते. तर शहरात पाम तेल साखर आणि स्कीम्ड मिल्क पावडर पासून बनवलेला खवा तसेच पाम ऑइल ने बनलेले चीज अर्थात एनालॉग पनीर हे शहरात गुजरात येथून दहा किलोच्या बॅग मध्ये स्पेशल बर्फी तसेच प्लास्टिकच्या डब्यात हलवा नावाने येणारे पनीर तुकाराम मुंढे यांच्या कारवाईमुळे येणे कमी प्रमाणात झाले आहे. त्यामुळे शहरात पनीर आणि खव्याच्या दरात वाढ झाली आहे ६ दुधापासून १ किलो शुद्ध खवा तयार होतो. गायीच्या दुधाचे दर सध्या ३८ ते ४० रुपये लिटर आहेत. त्याप्रमाणे २४० रुपयांच्या दुधापासून १ किलो खवा बनवता येतो. त्यात इंधन व मजुरीचा खर्च जमेस धरावा लागतो. त्यामुळे खवा हा किमान ३०० रुपये किलोपेक्षा कमी दराने विक्री करता येणे शक्य नाही. पनीरसाठी ७ ते ८ लिटर दुधाची आवश्यकता असते.

# जन्म–मृत्यूचा फेरा आणि भ्रष्टाचाराचा वेढा

## ♦ अकोला महापालिकेत अडचणींचा डोंगर

प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** माणसाचा जन्म होतो, तेव्हा आनंदाची लकेर उमटते आणि जेव्हा तो जगाचा निरोप घेतो, तेव्हा मागे उरते केवळ शांतता आणि आठवणी. पण, या दोन्ही टोकांच्या प्रवासाला शासकीय चौकटीत अधिकृतता देणारा अकोला महानगरपालिकेचा 'जन्म-मृत्यू आणि विवाह नोंदणी विभाग' सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. येथे सामान्य माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या नोंदींचा खेळ मांडला गेला आहे. हा खेळ केवळ 'अनागोंदी' कारभाराचा नाही, तर तो आहे अधिकृत कागदपत्रांच्या चितेवर रचलेल्या एका मोठ्या घोटाळ्याचा !.

आज अकोल्यातील सामान्य नागरिक पालिकेच्या पायऱ्या झिजवताना थकला आहे. 'पैसे द्या आणि कोणाचाही दाखला न्या,' अशी उघड यंत्रणा इथे कार्यरत असल्याचा संताप नागरिकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतोय. एखाद्याच्या जन्माचा दाखला मिळवणे किंवा कुटुंबातील व्यक्ती गमावल्यानंतर मृत्यूचा दाखला मिळवणे, हा नागरिकांचा हक्क आहे. पण पालिकेच्या या विभागाने याच हक्काला दलालांच्या दारात गहाण ठेवले आहे.

### सात जन्माचे सात प्रश्न ?

- ♦१.ज्या जन्म-मृत्यू नोंद पुस्तिकेवर संपूर्ण कुटुंबाचे भविष्य आणि कायदेशीर हक्क अवलंबून असतात, त्या नोंदींवर निबंधक व उपनिबंधकांच्या अधिकृत सह्याच गायब आहेत. सह्या नसलेले हे रेकॉर्ड केवळ कागदाचे कपटे आहेत की कायदेशीर दस्तऐवज ?
- ♦२. देश डिजिटल होत असताना, अकोला पालिकेत कोणाच्या आदेशाने ऑनलाईन अर्ज स्वीकारणे बंद केले गेले? नागरिकांना मुद्दाम कार्यालयात चकरा मारायला लावून, दलालांचे खिसे भरण्यासाठीच हा ऑनलाईनचा गाशा गुंडाळला गेला का, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत.
- ♦३. मूळ नोंद वहीतील अनुक्रमांक आणि नागरिकांच्या नावांमध्ये परस्पर बदल करण्यात आले आहेत. हा 'अदृश्य हात' कोणाचा आणि हा फेरफार कोणाच्या फायद्यासाठी झाला ?. रजिस्टर मधील रिकाम्यात जागेत कोणाचा मध्येच कसा जन्म घुसविला गेला.
- ♦४. नागरिकांनी वर्षानुवर्षांपूर्वी केलेले मूळ अर्ज कुठे गेले ? शासकीय नियमानुसार ते जतन का करण्यात आले नाहीत ? की पुरावे नष्ट करण्यासाठी ते गायब केले ?. रेकॉर्ड सुरक्षेचे तीन तेरा वाजले असून त्यास जबाबदार कोण. बारकोडचे जन्म दाखले आणि नोंद यात तफावत कशी.
- ♦५. अनेक महत्त्वाच्या प्रकरणांच्या मुख्य फाईल्स कार्यालयातून गायब आहेत. जुना रेकॉर्ड तपासता येऊ नये म्हणून हा जाणीवपूर्वक केलेला कट तर नाही ना ?. जन्म मृत्यू विभागाचे संगणकीकरण झाले असून नस्ती, कागदपत्रे सुरक्षित का नाही.
- ♦६. संसार सुरू करणाऱ्या जोडप्यांच्या विवाहाचे अधिकृत रेकॉर्ड योग्य रीतीने अद्ययावत (मेंटेन) का ठेवले जात नाही ?. जोडप्यांचे फोटो, साक्षीदार,आधार कार्ड यांच्या फाईल्स कुठे आहे.त्याचे रेकॉर्ड मेंटेन का नाही.
- ♦७. सर्वात धक्कादायक प्रकार म्हणजे विवाह नोंदणीच्या मूळ अनुक्रमांकावर आधीच्या जोडप्याच्या नावावर सरळ 'व्हाईटनर' लावून किंवा ते खोडून दुसऱ्याचेच नाव चढवले गेले आहे. हा थेट फसवणुकीचा आणि गुन्हेगारी स्वरूपाचा प्रकार आहे.



### नागरिकांची ससेहोलपट आणि आशेचा किरण

एकीकडे महापालिका सभापती विजय अग्रवाल यांनी या प्रकरणी कामकाज गतिमान करण्याचे आदेश दिले असले, तरी मूळ घोटाळ्याची पाळेमुळे खूप खोलवर रुजलेली आहेत. ही केवळ प्रशासकीय चूक नाही, तर एका सामान्य माणसाच्या अस्तित्वाशी आणि कायदेशीर हक्कांशी खेळणारा हा मोठा गैरव्यवहार आहे. आपल्या हक्काच्या दाखल्यासाठी खिशातले पैसे दलालांना मोजावे लागणारा अकोलेकर आज उद्विग्न झाला आहे.या भ्रष्टाचाराच्या दलदलीतून अकोलेकरांना बाहेर काढण्याची जबाबदारी आता प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्यावर आली आहे. जन्म आणि मृत्यूच्या फेऱ्यात अडकलेल्या सामान्य माणसाला या घोटाळ्याच्या फेऱ्यातून कधी न्याय मिळणार, हाच आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे.

# राजीव बोचे यांचा जमानत अर्ज फेटाळला

प्रतिनिधी १२ जून

**अकोट :** काँग्रेस नेते हिदायत पटेल खून प्रकरणातील संशयित आरोपी राजीव बोचे यांचा जमानत अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश बी.एम. पाटील यांनी ११ जून रोजी फेटाळून लावला. हिदायत पटेल यांच्या खून प्रकरणी त्यांचा पुतण्या फिर्यादी फतेहअली खान रफतउल्ला खान पटेल रा. मोहाळा यांनी अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती. हिदायत पटेल हे मोहाळा येथील मशिदमध्ये नमाज झाल्यावर वाचन करीत असतांना गावातीलच उबेद पटेल राजी उर्फ कालू पटेल याने हिदायत पटेल यांच्यावर चाकूने वार करून गंभीर जखमी केले होते. दुसर्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात संशयित आरोपी राजीव बोचे यांच्यासह इतर ६ आरोपींविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल आहे. राजीव बोचे हे २७ एप्रिल पासून कारागृहात आहेत.

# युरिया खत मिळण्यासाठी शेतकऱ्यांची वणवण, कृषी दुकानासमोर शेतकऱ्यांच्या रांगा

प्रतिनिधी १२ जून

**कुटासा:** खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना तालुक्यातील शेतकऱ्यांची युरिया खतासाठी अक्षरशःझुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अद्याप पेरणीला पूर्णपणे सुरुवात झालेली नसतानाही कृषी सेवा केंद्रांसमोर पहाटेपासूनच शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. भविष्यात खताचा तुटवडा निर्माण होऊ नये या भीतीने शेतकरी युरिया खरेदीसाठी मोठी गर्दी करत आहेत.एकीकडे



शेतीची पूर्वतयारी सुरू असताना दुसरीकडे खत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. विशेषतः अल्पभूधारक व अत्यंत अल्पभूधारक शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली असून, दिवसाची मजुरी बुडवूनही खत मिळेल याची खात्री नसल्याने त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे.काही कृषी सेवा केंद्रांवर मर्यादित कूपन वाटप होत असल्याने अनेक शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.तर काही कृषी सेवा केंद्र चालक हे रात्री जवळच्या लोकांना बोलावून कुपन वाटप करत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत त्यामुळे आर्थिक नुकसानासोबतच पेरणीपूर्व नियोजनावरही परिणाम होत आहे.युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी करीत आहेत.दरम्यान, पेरणीपूर्वीच युरिया खतासाठी होत असलेली मोठी गर्दी ही आगामी खरीप हंगामातील खताच्या वाढत्या मागणीचे संकेत मानली जात असून, प्रशासनाने वेळेत नियोजन न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उन्हाचा तडाखा कायम; अकोल्यात पाण्याची मागणी वाढली

## ♦ महानगरपालिकेकडून ९ टँकरद्वारे पाणीपुरवठा

प्रतिनिधी १२ जून

**अकोला :** पावसाळ्याला सुरुवात होऊनही अकोल्यातील तापमानाचा पारा अद्याप ४२ ते ४३ अंश सेल्सिअसच्या आसपास कायम आहे. वाढत्या उकाड्यामुळे आणि पाण्याच्या गरजेमुळे नागरिकांना दिलासा देण्यासाठी अकोला महानगरपालिकेने नऊ टँकरची व्यवस्था केली आहे. या टँकरच्या माध्यमातून हद्दवाढ भागांसह विविध परिसरात पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पावसाळा सुरू झाला असला तरी अकोल्यातील उष्णतेचा तडाखा काही कमी झालेला नाही. शहरात तापमान ४२ ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असल्याने अनेक भागांमध्ये पाण्याची गरज तीव्रतेने जाणवत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी अकोला महानगरपालिकेकडून सध्या नऊ टँकर कार्यरत ठेवण्यात आले आहेत. यापैकी चार टँकर दररोज शहरातील झाडांना पाणी देण्याचे काम करतात, नंतर विविध क्षेत्रात जातात, तर उर्वरित टँकर हद्दवाढ क्षेत्रातील पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येत आहेत. महानगरपालिकेने गुड्डधी परिसरासाठी एक, शिवर भागासाठी दोन आणि मलकापूर परिसरासाठी एक असे चार टँकर राखीव ठेवले आहेत. याशिवाय इतर भागांमध्ये पाण्याची गरज निर्माण झाली आहे.

# धनादेश अनादर प्रकरणात ६ महिन्याची शिक्षा व ३० लाख भरपाई

प्रतिनिधी १२ जून

**शेगाव :** न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, शेगाव येथील मा. एन. डी. मेश्राम यांनी दिलेल्या निकालात गोकुळ फॅब्रिक्सचे मालक शिवकुमार पलानीसामी यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत दोषी ठरविले. विभूम कॉटस्पिनचे मालक चतुर्भुज नंदलाल भट्टड, महेश चतुर्भुज भट्टड यांनी ही तक्रार दाखल केली होती. उधारीवर पुरविण्यात आलेल्या कापूस गाठींच्या मोबदल्यापोटी देण्यात आलेला १५ लाख रुपयांचा धनादेश निधीअभावी बँकेने नामंजूर केला होता. कायदेशीर नोटीस देऊनही आरोपीने रक्कम अदा न केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे न्यायालयाने आरोपीस ६ महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच तक्रारदारास ३० लाख रुपये नुकसानभरपाई ९ टक्के वार्षिक व्याजासह आणि ५० हजार रुपये न्यायालयीन खर्च अदा करण्याचे आदेश दिले. पक्षातर्फे ॲड. आर. व्ही. खंडेलवाल व ॲड. तैयडे यांनी कामकाज पाहिले

# सारथी तर्फे किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती:** मराठा, कुणबी व कुणबी-मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या 'सारथी' संस्थेच्या वतीने राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नुकताच हा उपक्रम पार पडला. छत्रपती शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करणे आणि शाहू महाराजांच्या लोककल्याणाचा विचार पुढे नेणे, हा यामागचा मुख्य उद्देश होता. या मोहिमेत अमरावती विभागांतर्गत चिखलदरा येथील गाविलगड आणि अकोला येथील असदगड किल्ल्यावर 'सारथी'च्या संशोधन अधिछात्रवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गाविलगड येथे उपव्यवस्थापकीय संचालक सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी शंकर गोरे, रूपेश पडघन, सदाशिव आरसोड, योगेश भोयर, पवन मापारी आणि कर्मचारी किरण चाफाले, देवानंद सोळंके व कुलदीप सूरकर यांनी परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेसोबतच विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रजातींच्या



## सिडबॉलद्वारे वृक्षारोपण उपक्रम

बिया, माती, शेण व बाविस्टीन पावडरचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले 'सिडबॉल' चिखलदरा परिसरात टाकले, जेणेकरून पावसाळ्यात उत्तम वृक्षनिर्मिती होईल. तसेच, अकोला येथील असदगड किल्ल्यावर अक्षय बांगर, अनिरुद्ध दळवी, अमोल धोत्रे, अजय काळे, सूरज पारस्कर आणि प्रिया शेटे या संशोधक विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवले. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीतील गड-किल्ल्यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले असून, नागरिकांनी या वास्तूंचे पावित्र्य राखावे व स्वच्छता ठेवावी, असे आवाहन 'सारथी' संस्थेने केले आहे.

# उच्च न्यायालयाची शिक्षण विभागाला चपराक, पण सीबीएसई विद्यार्थ्यांचे काय ?

प्रतिनिधी १२ जून

**यवतमाळ :** उन्हाळ्याच्या सुट्ट्यांनंतर विदर्भातील शाळा कधी सुरू होणार, यावर शिक्षण विभागाने घातलेला गोंधळ अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मिटवला आहे. विदर्भातील सूर्याचा व प्रकोप आणि जीवाची लाही लाही न करणारी उष्णता लक्षात घेता, न्यायालयाने शिक्षण विभागाचा २२ जूनचा अट्टहास मोडून काढत शाळा थेट ३० जूनपासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या या फटकाऱ्यामुळे शिक्षण विभागाचा मनमानी कारभार चव्हाट्यावर



आला असून स्टेट बोर्डाच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायालयाच्या या आदेशाने बहुतांश विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असला, तरी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या नशिबी मात्र जूनचे चटके कायम राहणार आहेत. हा नियम सीबीएसई शाळांना लागू नसल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे या निष्पाप विद्यार्थ्यांना कडक उन्हातच तापावे लागणार आहे. ऋतू आणि निसर्गाचे नियम सर्वांसाठी सारखेच असताना, केवळ बोर्ड वेगळे आहे म्हणून लहान मुलांच्या आरोग्याशी हा खेळ का? असा संतप्त सवाल आता पालकांमधून उपस्थित केला जात आहे. उन्हाचा चटका स्टेट बोर्डाच्या मुलाला जेवढा लागतो, तेवढाच तो सीबीएसईच्या मुलालाही लागतो, हे समजायला कोणत्याही प्रशासकीय शहाणपणाची गरज नाही. न्यायालयाने तत्त्वतः दिलासा दिला असला, तरी शिक्षण क्षेत्रातील या उघड दुजाभावामुळे सीबीएसईच्या विद्यार्थ्यांवर 'सरकारी' अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली असून, पालकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

### स्टेट बोर्डाच्या शाळा ३० जूनलाच : प्रभारी शिक्षणाधिकारी

न्यायालयाच्या आदेशानुसार यवतमाळ जिल्ह्यातील स्टेट बोर्डाच्या शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व खासगी शाळा ह्या ३० जून रोजी सुरु होतील. त्यापूर्वी कोणतीही शाळा सुरु होणार नाही, सीबीएसईच्या शाळा राज्य शासनाच्या अंतर्गत येत नसल्याने त्यांच्या विषयी काही सांगता येणार नसल्याची प्रतिक्रिया प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.) किशोर पागोरे यांनी दिली.

# आचारसंहितेच्या काळात अमरावती महानगरपालिकेत किरीट सोमय्या यांची बैठक; काँग्रेसची तीव्र निदर्शने

प्रतिनिधी १२ जून

**अमरावती :** महानगरपालिकेमध्ये काल दिनांक ११ जून २०२६ रोजी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी घेतलेल्या बैठकीचा अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.कोणतेही संविधानिक अथवा प्रशासकीय पद नसताना किरीट सोमय्या वारंवार अमरावतीत येऊन महानगरपालिकेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहेत.विशेष म्हणजे राज्यात आचारसंहिता लागू असताना अशा प्रकारे महानगरपालिकेत बैठक घेणे आणि जन्म-मृत्यू दाखल्यांच्या विषयावर राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न करणे अत्यंत दुर्दैवी आहे.यापूर्वी देखील किरीट सोमय्या यांनी अमरावती महानगरपालिकेमध्ये बैठक घेतली होती. त्यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवून मनपा आयुक्तांकडे अधिकृत आक्षेप सादर करण्यात आला होता.मात्र, त्या निषेधाची दखल घेण्यात आली नाही.अमरावती शहरातील विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता व नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी भाजप नेते केवळ प्रसिद्धीच्या राजकारणातून शहरात संभ्रम आणि तणावाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.अमरावतीकरांच्या प्रश्नांवर उत्तर देण्यात अपयशी ठरलेले भाजप नेते आता केवळ नौटंकी आणि राजकीय स्टंटबाजीच्या माध्यमातून जनतेची दिशाभूल करण्याचे काम करीत आहेत.अमरावती महानगर पालिकेचा वापर राजकीय मंच म्हणून करण्याचा हा प्रकार तात्काळ थांबवावा, तसेच शहराचे वातावरण खराब करणाऱ्या अशा कृत्यांची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे असे बबलु शेखावत अध्यक्ष अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी यांनी सांगितले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135